**Impact Factor – 7.139 ISSN – 2319-8648**

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**Aug 2021 Special Issue- 40 Vol. 2**

**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

**Shaurya Publication , Latur**

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Issue 40 , Vol. 2 (Indexed) Aug. 2021 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

# Index

1. हबीब तनवीर कृत नाटक 'आगरा बाज़ार' पर नजीर का प्रभाव — 6
श्री नागेश सदानंदे, डॉ. बाळसाहेब सोनवणे

2. उपन्यास 'अम्रत और विष' आधुनिक समाज का यथार्थवादी दस्तावेज — 12
प्रा.डॉ.शहाजी बाला चव्हाण

3. छत्रपती शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण — 15
डॉ. कांबळे आर. एस.

4. मराठवाडा विभागातील बॉल-बॅडमिंटन या खेळाची सद्यस्थिती व भवितव्य. — 18
प्रा.डॉ.राजेंद्र सुर्यवंशी

5. छत्रपती शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण — 21
डॉ. कांबळे आर. एस.

6. धर्मनिरपेक्षता और पंडित दीनदयाल उपाध्याय का राष्ट्रवादी चिंतन — 24
बाबूलाल मीणा, डॉ विभा कौशिक

7. लोकल फॉर वोकल कोविड–19 के संदर्भ में — 27
डॉ. देवेश रंजन त्रिपाठी, डॉ. अदिती गोस्वामी

8. देगलूर तालुक्यातील तडखेल, खानापूर, नरंगल, येरगी, देवापूर आणि बेंम्बरा येथील शिलालेखांचा अभ्यास — 30
सौ.नागेश्वर अनिता मोहनराव

9. गोविंद (गोपाळ) गणपत महार व छत्रपती संभाजी महाराज — 34
प्रा.डॉ. शिवाजी गाढे

10. पर्यावरणात्मक कृषीक्षेत्राचा आर्थिक विकास एक अभ्यास — 39
प्रा. डॉ. सर्जेराव गंगाधर गोल्डे

11. पूर्व विदर्भातील आदिवासी समाजाचे अध्ययन केंद्र गोटूल युवागृह
प्रा डॉ आनंद के भोयर

12. **प्रवासी साहित्यकार राजेंद्र यादव के ललित साहित्य में राम कथा का व्यवहारिक पक्ष** — **51**
**अनुपमा तिवारी**

13. प्राचीन काळातील तेर — 54
अनिल तानाजी जाधवर

# CURRENT GLOBAL REVIEWER

Issue 40 , Vol. 2 (Indexed) Aug. 2021 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139



14. 2014 लातूर लोकसभा (अनु.जाती) मतदारसंघाची निवडणूक 59
जितेंद्र वामराव गायकवाड

15. बालकामगार : एक सिंहावलोकन 63
प्रा.डॉ. डी.एन. दामावले

16. अण्णा भाऊ साठे जीवन व कार्य
प्रा डॉ भुजंग पाटील

17. आळ आणि काळ अर्थशास्त्रीय विश्लेषण
प्रा डॉ शिवराज पाटील

18. फकिरा संघर्षाची कथा
प्रा प्रशांत कांबळे

19. महात्मा फुले आणि स्त्री शिक्षण
प्रा डॉ रजनी अ बोरोळे

20. वारणेचा वाघ समाजशास्त्रीय विश्लेषण
प्रा डॉ एस पी घायाळ

21. कोरोना काळातील कविता
प्रा डॉ गोविंद काळे

22. होय व्यायामाने कोरोनावर मात करणे शक्य
प्रा डॉ भास्कर माने

23. उच्चशिक्षण व व्यक्तिमत्व विकास
प्रा डॉ सिद्धेश्वर शेटकर

24. ਉੱਚੀਂ ਰੱਥੋਂ ਦੀ ਧੀ : ਡਾ. ਦਲੀਪ ਕੌਰ ਟਿਵਾਣਾ 95
ਡਾ. ਪਰਮੀਤ ਕੌਰ

25. भारत आणि शेजारील राष्ट्रांच्या राजकीय सीमा आणि परस्परसंबंधाचे विश्लेषण 105
**प्रा. डॉ. अरूण पेंटावार**

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Issue 40 , Vol. 2 (Indexed) Aug. 2021 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

# भारत आणि शेजारील राष्ट्रांच्या राजकीय सीमा आणि परस्परसंबंधाचे विश्लेषण

**प्रा. डॉ. अरूण पेंटावार**

**राज्यशास्त्र विभागप्रमुख, सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव.**

---

**प्रस्तावना :-**

प्रत्येक राष्ट्र आपल्या परराष्ट्र धोरणामध्ये शेजारील राष्ट्रांशी चांगले संबंध प्रस्थापित करण्यास प्राधान्य देत असतो. कारण शेजारील राष्ट्रांशी असणारे संबंध देशाच्या सामरिक व गैरसामरिक सुरक्षेला प्रभावित करत असतात. भारताच्या शेजारील राष्ट्रांमध्ये पाकिस्तान, अफगाणिस्तान, चीन, नेपाळ, भूतान, बांग्लादेश, म्यानमार, श्रीलंका व मालदीव यांचा समावेश होतो. भारताचे या देशांशी असणारे संबंध ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातून म्हणजेच स्वातंत्र्यापासून कसे उत्क्रांत होत गेले हे जाणून घ्यावे लागेल. तसेच समकालीन परिप्रेक्ष्यामध्ये विचार करताना आर्थीक व व्यूहात्मक बाबींच्या पाश्र्वभूमीवर अभ्यासावे लागतील. सध्या केंद्रातील सरकार शेजारील राष्ट्रांबरोबरच्या संबंधांना प्रचंड महत्त्व देत असल्याचा दावा करते. कारण पंतप्रधान मोदी यांनी मे २०१४ मध्ये आपल्या शपथविधी कार्यक्रमाकरिता सर्व सार्क राष्ट्रांच्या नेत्यांना आमंत्रित करून नेबरहूड डिप्लोमसी सुरू केली. तरीही भारताच्या शेजारील राष्ट्रांच्या संबंधांच्या संदर्भामध्ये आधीच्या यूपीएप्रणीत सरकारच्या धोरणांचे सातत्य दिसून येते. बांग्लादेशाबरोबर झालेला सीमेवरील जमीन देवाण-घेवाणविषयक करार वगळता भारत-पाकिस्तान किंवा भारत-चीन संबंधांमध्ये कोणतीही लक्षणीय प्रगती दिसून येत नाही. तसेच काही देशांबरोबरचे संबंध ताणलेले आहेत.

सार्क शिखर परिषद (२०१४) मध्ये सार्क सदस्य राष्ट्रांपकी बहुसंख्य राष्ट्रांनी सार्क सदस्यत्व प्राप्त होण्याबाबत चीनच्या अर्जाचा अनुकूल विचार व्हावा असे मत व्यक्त केले. यावरून भारत शेजारील राष्ट्रांमध्ये एकाकी पडल्याचे दिसून आले. सुरुवातीपासूनच भारताचे शेजारील देशांशी संबंध समानता व परस्परांचा आदर या मूलभूत तत्त्वांवर आधारित आहे. या शोधनिबंधाच्या माध्यमातुन भारत व शेजारील राष्ट्रांच्या सीमा आणि परस्पर संबंधांचा समकालीन परिप्रेक्ष्यामध्ये आढावा घेण्यात आलेला आहे.

भारताची चतु:सीमा

भारतीय द्वीपकल्प अरबी समुद्र, हिंदी महासागर व बंगालच्या उपसागराने वेढलेला आहे. हिंदी महासागरात तमिळनाडूच्या जवळ श्रीलंका हा शेजारी देश आहे. पश्चिम बंगाल ते त्रिपुरा पर्यंत घोड्यांच्या नाल्याच्या आकारात बांगलादेशास वेढलेले आहे. पूर्वेस म्यानमार आहे तर पूर्वोत्तर राज्यांच्या सीमा चीनला भीडल्या आहे. स्कीम व अरुणाचल प्रदेश यांच्यामधील प्रदेशात भूतान हा देश आहे. सिक्कीम व उत्तरांचल ह्या राज्यांच्या मध्ये नेपाळची सीमा उत्तर प्रदेश व बिहार या राज्यांना लागते. उत्तरांचल पासून पुन्हा उत्तरेकडे लद्दाख पर्यंत चीनची सीमा आहे. काश्मीर मधील सियाचीन हिमनदीपासून ते गुजरात राज्यातील कच्छच्या रणापर्यंत पश्चिमेकडे पाकिस्तानची सीमा आहे.

**भारताचे स्थान आणि विस्तार :**

भौगोलिकदृष्ट्या विचार केल्यास भारत हा उत्तर गोलार्धात येतो. भारताच्या तिन्ही बाजूने पाणी असल्यामुळे हा आग्नेय आशियातील ते एक प्रमुख द्वीपकल्प बनले. आहे. भारताच्या मुख्य भूमीचे स्थान हे 80.40 ते 370.60 उत्तर अक्षांश आणि 680.70 ते 970.250 पूर्व रेखांशामध्ये विस्तारले आहे. अंदमान आणि निकोबार या बेटांनी पुढे दक्षिणेकडे भारताचा रेखांशीय विस्तार वाढविला आहे. ग्रेट निकोबार बेटातील इंदिरा पॉईंट हे भारताचे सर्वात दक्षिणेकडील टोक आहे. तर जम्मू व काश्मीर मधील इंदिरा कोल हे भारतातील उत्तरेकडील टोक आहे. भारताच्या मध्यातून 23 1/20 उत्तर अक्षांश गेले आहे. ते कर्कवृत्त या नावाने ओळखले जाते. तर 82 1/20 पूर्व रेखांश देशाच्या मध्यातून गेलेले आहे. हे भारताचे मध्य रेखांश असून ते अलाहाबाद शहराजवळून गेलेले आहे. त्यावरूनच भारताची प्रमाणवेळ (आयएसटी) निश्चित करण्यात आलेली आहे.

**भारताचा विस्तार :**

रशिया, कॅनडा, चीन, अमेरिकेची संयुक्त संस्थाने, ब्राझील आणि ऑस्ट्रेलिया यासारख्या देशानंतर भारत हे जगातील सातवे मोठे राष्ट्र आहे. भारताचे एकूण क्षेत्रफळ 32, 87, 263 चौ.कि.मी इतके आहे. जगाच्या एकूण

| Issue 40 , Vol. 2 (Indexed) Aug. 2021 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

भूभागापैकी 2.42 % भाग भारताने व्यापलेला आहे. भारताची पूर्वपश्चिम रूंदी 2,933 कि.मी आणि उत्तर - दक्षिण लांबी 3,214 कि.मी, इतकी आहे.

**भारताच्या सीमा :**

भारताला भूसीमा व जलसीमा दोन्ही लाभल्या आहेत. देशाच्या भूसीमेची लांबी 15,200 कि.मी. आहे. उत्तरेकडे असलेला हिमालय पर्वत ही भारत आणि चीन यांच्यातील नैसर्गिक सीमा आहे. भारताच्या प्रमुख भूप्रदेशाला 6100 कि.मी. लांबीची समुद्र किनारपट्टी लाभलेली आहे. (अंदमान निकोबार आणि लक्षद्वीप बेटांचा किनारा धरून ती लांबी 7516.5 कि. मी. इतकी होते.) भारताच्या पश्चिमेला अरबी समुद्र, पूर्वेला बंगालचा उपसागर आणि दक्षिणेला हिंदी महासागर आहे.

**भारत आणि शेजारील राष्ट्रे व त्यांच्या राजकीय सीमा**

भारताच्या शेजारी एकूण 7 राष्ट्रे आहेत. भारताच्या भौगोलिक सीमा या सात देशांना लागुन आहेत. भारताच्या एकुण घटकराज्यांपैकी 17 घटकराज्यांच्या सीमा ह्या दुसऱ्या देशांच्या सीमांना लागुन आहेत. सर्वसाधारणपणे सीमांचे भूसीमा व जलसीमा असे दोन प्रकार पडतात. भारताच्या वायव्येला पाकिस्तान आणि अफगणिस्तान, उत्तरेला नेपाळ, भूतान आणि चीन. तसेच पूर्वेकडे बांग्लादेश आणि म्यानमार (पूर्वीचा ब्रह्मदेश) हे देश आहेत. भारताच्या आग्नेयेला श्रीलंका देश असून तो पाल्कची सामुद्रधुनी आणि मन्नारचे आखात यामुळे भारताच्या प्रमुख भूभागापासून वेगळा झाला आहे. तसे वास्तवि क पाहि ले तर भारताच्या शेजारी असलेल्या देशांची संख्या ही 10 पेक्षाही जास्त आहे. यामध्ये 07 राष्ट्रे ही प्रत्यक्ष भूसीमा लागून असलेली आहेत तर 05 राष्ट्रे ही जलसीमा लागून असलेली आहेत.

**भारताचे शेजारील राष्ट्रे व सीमा विस्तार**

| अ.क्र. | सीमावर्ती देश | सीमा लांबी (कि.मी.) | सीमारेषेचे नाव | प्रमाण/ टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 01 | बांगलादेश | 4096 | पुर्बाचल ऑपरेटिग झीरो रेषा | 26.95 |
| 02 | चीन | 3488 | मॅकमोहन रेषा | 25.77 |
| 03 | पाकिस्तान | 3310 | रॅडक्लिफ रेषा | 21.78 |
| 04 | नेपाळ | 1752 | ओपन बॉर्डर | 13.53 |
| 05 | म्यानमार | 1458 | इंडिया - मॅनमार बॅरीअर | 9.59 |
| 06 | भूतान | 578 | इंडो – भूतान रेषा | 3.86 |
| 07 | अफगाणिस्तान | 80 | डयुरँड रेषा | 0.52 |
| 08 | श्रीलंका | 30 | रामसेतू/अॅडम्स ब्रिज | 0.30 |

**स्त्रोत : https://www.mpsctoday.com/india-general-information/**

**भारताचे शेजारील राष्ट्रे व सीमा विस्तार : एक विश्लेषण**

01) भारत - बांग्लादेश सीमा

भारताचे जे शेजारी आहेत त्यापैकी सर्वात ज्यास्त सीमा या बांग्लादेशाला लागुन आहेत. त्यामुळे भारत आणि बांग्लादेश संबंध नेहमीच महत्वाचे मानले जातात. भारत आणि बांग्लादेशदरम्यान सुमारे 4096 कीलोमीटर्स लांबीची भुसीमा आहे. पश्चिम बंगाल, मेघालय, आसाम, त्रिपुरा, मिझोरम या भारतीय राज्यांमध्ये ही सीमारेखा येते. यापैकी सर्वाधिक 2216 किलोमीटर्स लांबीची सीमा ही पश्चिम बंगाल राज्यात आहे. भारतातून गंगा, ब्रम्हपुत्रासोबतच

Issue 40 , Vol. 2 (Indexed) Aug. 2021 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

जवळपास 54 नद्या बांग्लादेशमध्ये जातात, आणि बहुतांश नद्यांनाही सीमेचाच दर्जा दिला गेलाय. या सीमेवरही घुसखोरी, अवैध तस्करी आणि दहशतवादी कारवाया होत असल्याने इथेही BSF तैनात करण्यात आली आहे.

02) भारत - चीन सीमा

भारत आणि चीन या दोन देशांमधील ही सीमा 3488 कीलोमीटर्स लांबीची आहे आणि ती जम्मू - काश्मीर, अरूणाचल प्रदेश, आणि हिमाचल प्रदेश या तीन भारतीय राज्यांलगत आहे. अरूणाचल प्रदेश व चीन यादरम्यान असणाऱ्या सीमारेषेलाच मॅकमोहन रेषा म्हटलं जातं. ही मॅकमोहन रेषा हेन्री मॅकमोहन या ब्रिटिश अधिकाऱ्याच्या पुढाकारातुन 1914 मध्ये आखण्यात आली.

03) भारत - पाकिस्तान सीमा

जगातल्या सर्वात जास्त तणावग्रस्त आंतरराष्ट्रीय सीमांच्या यादीत या बॉर्डरला वरचं स्थान मिळतं. या सीमेची एकूण लांबी 3310 किलोमीटर्स आहे आणि या सीमेवर भारतातली गुजरात, राजस्थान, पंजाब आणि जम्मू - काश्मीर ही 04 राज्ये वसलेली आहेत. 3310 किलोमीटर्स पैकी 1225 किलोमीटर्स सीमा ही एकट्या जम्मू काश्मीर राज्याने व्यापलेली आहे. या सीमेला वेगवेगळया ठिकाणी वेगवगळी नावे दिलेली आहेत. लाईन ऑफ कंट्रोल हा सीमेचा भाग काश्मिर आणि पाकिस्तानव्याप्त आझाद काश्मिरला वेगळं करतो, वाघा बॉर्डर ही भारतातील पंजाब आणि पाकव्याप्त पंजाबला विभागते, तर झिरो पॉईन्ट नावाची सीमा राजस्थान आणि गुजरातला पाकिस्तानी सिंध प्रांतापासून वेगळं करते.

04) भारत - नेपाळ सीमा

भारत आणि नेपाळ दरम्यान असणारी सीमारेखा ही 1752 किलोमीटर्स लांबीची आहे. उत्तराखंड, उत्तरप्रदेश, बिहार आणि सिक्कीम या राज्यांना लागून ही आंतरराष्ट्रीय सीमा आहे आणि ती चक्क दोन्ही बाजूंनी ये-जा करण्यासाठी खुली आहे. दोन्ही देशांतले नागरीक विना पासपोर्ट आणि व्हिसा घेताही सीमा ओलांडून भारतात किंवा नेपाळमध्ये जाऊ शकतात, राहू शकतात आणि कामही करू शकतात. भारतातून नेपाळमध्ये प्रवेश करण्यासाठी सोनौली, बीरगंज आणि काकरभीटा हे तीन प्रमुख मार्ग आहेत.

05) भारत - म्यानमार बॉर्डर

भारत आणि म्यानमार दरम्यान 1458 कीलोमीटर्स लांबीची सीमारेखा आहे आणि ती अरूणाचल प्रदेश, नागालॅन्ड, मणीपुर आणि मिझोरम या राज्यांलगत येते. यापैकी 520 किलोमीटर्स लांबीची सीमा ही अरूणाचल प्रदेशात येते. या सीमेवर भारतीय सेनेच्या आसाम रायफल्सकडून नियंत्रण ठेवलं जातं.

06) भारत - भुतान सीमा

भारत आणि भुतानदरम्यानची सीमा ही 578 किलोमीटर्स लांबीची आहे, जी सिक्कीम, पश्चिम बंगाल, आसाम आणि अरूणाचल प्रदेश या राज्यांलगत येते. यापैकी सर्वाधिक लांबीची 267 किलोमीटर्सची सीमा ही आसामची आहे. भारत - भुतान सीमा हा एकमेव मार्ग आहे जिथून भूतानमध्ये प्रवेश करता येतो. कारण चिनची संपूर्ण सीमा ही बंद केलेली आहे. भारतातून जयगांव या एकमेव पॉईन्टवरून भुतानमध्ये प्रवेश करता येतो. या सीमेचं रक्षण भारताचे सशस्त्र सीमा दल करतं.

07) भारत - अफगाणिस्तान सीमा

ही सीमा अत्यंत लहान आहे. ही नेमकी जम्मू काश्मीरच्या त्या भागात येते जिथं सद्या पाकीस्तानने कब्जा केलाय. काश्मिरच्या या भागाला PoK म्हणजेच पाकव्याप्त काश्मीर म्हणून ओळखलं जातं. या भागावर भारतही आपला हक्क सांगतो. पण सद्यातरी हा भाग पाकिस्तानच्या नियंत्रणाखाली आहे. त्यामुळे जोपर्यंत पाकव्याप्त काश्मीरचा भाग भारताचा की पाकिस्तानचा हे ठरत नाही, तोपर्यंत भारताला अफगाणी सीमा आहे की नाही हे सांगणंही कठीण आहे. पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्ये असणाऱ्या या सीमेलाच डुरण्ड रेखा म्हणून ओळखलं जातं.

08) भारत - श्रीलंका सीमा

भारत आणि श्रीलंकेदरम्यानची सीमा ही जगातील सर्वात लहान आंतरराष्ट्रीय सीमांपैकी एक आहे. भारताच्या दक्षिण-पुर्व समुद्र किनाऱ्यावरील रामेश्वरम बेटाला आणि श्रीलंकेच्या मन्नार बेटाला जोडणारा हा ३० कीलोमीटर्स लांबीचा रामसेतू आहे. त्यालाच ॲडम्स ब्रिजही म्हटलं जातं. भौगोलिक रचनेनुसार चुनखडीने बांधलेला हा सेतु एकेकाळी भारत आणि श्रीलंकेला जोडणारा दुवा होता जो आज पाण्याखाली गेलाय.

| Issue 40 , Vol. 2 (Indexed) Aug. 2021 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

**भारत आणि शेजारील राष्ट्रांच्या परस्पर संबंधांचेविश्लेषण**

भारताचे शेजारील देशांशी संबंध सुरुवातीपासूनच समानता व परस्परांचा आदर या मूलभूत तत्त्वावर आधारित आहेत. सर्वप्रथम आपण भारत व शेजारील देशांच्या संबंधाचा समकालीन परिप्रेक्ष्यामध्ये आढावा घेऊयात. भारत व चीनमधील द्विपक्षीय संबंधांमध्ये स्पर्धा व सहकार्य या दोन्ही पलूंचा समावेश होतो. या संबंधांमध्ये धोरणात्मक अविश्वास (Strategic Mistrust) हे आव्हान दिसून येते. सीमापार नद्यांच्या पाण्याचा वापर, व्यापार असमतोल, सीमा प्रश्न, व्यापार व गुंतवणुकीसाठी संपर्क प्रस्थापना यांसारखे द्विपक्षीय मुद्दे दिसून येतात. तसेच भारत व लगतच्या प्रांतावर गंभीर परिणाम करू शकणाऱ्या आणि (Hard) आणि (Soft Power) सत्ता वाढवण्याचे प्रयत्न चीनकडून केले जात आहेत.

चीन हा देश आर्थिक व लष्करी महासत्ता म्हणून उदयास आलेला आहे. चीन आपल्या आर्थिक सामर्थ्याच्या साहाय्याने दक्षिण आशियायी राष्ट्रांवर आपला प्रभाव स्थापित करताना दिसतो. चीनचे वन बेल्ट वन रोड व मॅरिटाइम सिल्क रोड (maritime silk road) यासारखे उपक्रम प्रत्यक्षदर्शी आर्थिक स्वरूपाचे असले तरी त्यामध्ये सामरिक दृष्टिकोन अंतांनहित आहे. चीनच्या या दृष्टिकोनाचा भारतावर परिणाम दिसून येतो. उदा. चीन व पाकिस्तान यांच्यामध्ये असणाऱ्या आर्थिक सहकार्याचा एक भाग म्हणजे चीन -पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर (सीपीईसी) आहे. हा भारताकरीता धोका असू शकतो.

भारत-पाकिस्तान संबंध नेहमीच संदिग्धतेमध्ये अडकलेले दिसतात. सीमावाद, दहशतवाद व काश्मीर प्रश्न हे ज्वलंत मुद्दे नेहमीच प्रभावी ठरलेले आहेत. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सुरक्षाविषयक विविध चिंता आणि बदलते संबंध लक्षात घेता या देशातील द्विपक्षीय संबंधांमध्ये संपूर्ण परिवर्तन घडून येण्यासाठी बराच काळ जावा लागेल. दहशतवादी कारवाया आणि परस्पर अविश्वास यांनी भारत- पाकिस्तान संबंधांना व्यापून टाकले.

भारत व अफगाणिस्तानमधील संबंध सलोख्याचे राहिले आहेत. अफगाणिस्तान भारतासाठी ऊर्जा सुरक्षिततेच्या दृष्टीने मध्य आशिया व पश्चिम आशियाचे प्रवेशद्वार असल्याने सामरिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण आहे. भारताने या प्रदेशात शांतता व स्थर्य प्रस्थापित करण्यासाठी आधारभूत संरचना आणि संस्थात्मक बांधणीसाठी २ अब्ज अमेरिकन डॉलर्स एवढी रक्कम खर्च केली.

भारत व नेपाळचे संबंध सध्या ताणलेले दिसतात. नेपाळमधील प्रस्थापित व्यवस्थेतील काही घटकांमध्ये भारताबाबत दीर्घकाळापासून असलेला संशय याला कारणीभूत आहेत. एप्रिल २०१५मध्ये नेपाळमध्ये झालेल्या प्रलयकारी भूकंपाच्या आपत्तीत भारताने मानवतावादी दृष्टिकोनातून प्रतिसाद दिला. पण या मदतकार्याला भारतीय प्रसारमाध्यमांनी ज्या प्रकारे प्रसिद्धी दिली त्यावर टीका झाली. नेपाळच्या राज्यघटनेबाबत भारताच्या प्रतिसादाला नेपाळच्या अंतर्गत बाबींमध्ये भारताने केलेल्या अवाजवी हस्तक्षेपाच्या दृष्टिकोनातून पाहिले गेले.

भारताचे जे शेजारी आहेत त्यापैकी सर्वात ज्यास्त सीमा या बांग्लादेशाला लागुन आहेत. त्यामुळे भारत आणि बांग्लादेश संबंध नेहमीच महत्वाचे मानले जातात. भारत-बांगलादेशातील संबंधांमध्ये मागील काही वर्षांपासून सुधारणा होत आहेत. या संदर्भात नुकताच झालेला सीमेवरील जमीन देवाणघेवाण करार महत्त्वपूर्ण आहे. या करारामुळे ४१ वर्षे जुना सीमाविषयक वाद संपुष्टात आला. तसेच सीमापार बेकायदेशीर कारवाया नियंत्रित करणे आणि सीमापार दहशतवादाचा धोका कमी करण्यामध्ये हा करार उपयुक्त ठरेल.

भारत श्रीलंकेतील संबंध मित्रत्वाचे राहिले आहेत. अलीकडे झालेल्या निवडणुकांचा निकाल लक्षात घेता भारत-श्रीलंका संबंधांना निश्चितच चालना मिळू शकेल. भारत व भूतानमधील संबंध परिपक्व बनलेले आहेत. भारत हा भूतानचा व्यापार व विकासातील मोठा भागीदार आहे. भारत भूतानकडून वीज आयात करतो. बहुतांश जलवीज प्रकल्प भारताच्या साहाय्याने उभारलेले आहेत.

भारत व म्यानमारमधील संबंध १९९०च्या दशकापासून सुरळीत झाले. दोन्ही देश व्यापार आणि गुंतवणुकीला प्रोत्साहन देत आहेत. तसेच सीमेवरील कारवाया, अमली पदार्थाची तस्करी रोखणे याबाबत दोन्ही देश संयुक्तपणे प्रयत्न करतात. भारत व मालदीवचे संबंध सर्वसाधारणपणे सौहार्दपूर्ण राहिलेले आहेत. मालदीवमध्ये सत्तांतर झाल्यानंतर उभय राष्ट्रांच्या संबंधांमध्ये चढ-उतार आहेत. मालदीव सध्या चीनकडे झुकल्याचे दिसते.

**समारोप**

सर्वाधीक लांब आंतराष्ट्रीय सीमा लाभलेल्या देशांच्या यादीत रशिया आणि चीननंतर भारताचा जगात तिसरा क्रमांक लागतो. मुळातच भारतीय उपखंडातील भारताचे भौगोलिक स्थान हे फक्त सार्क आणि आसियान राष्ट्रे यांच्यापुरतीच महत्वाची नसुन मध्य आशिया गल्फ राष्ट्रे यांच्याबरोबरच संपूर्ण जगाच्या आर्थिक प्रगतीवर दुरगामी परिणाम करणारे आहे. त्यामुळेच अधून मधुन भारत चीन संघर्ष व भारत पाकि स्तान संघर्ष दि सून येते. सद्या पाकिस्तान, चीन, म्यानमार, बांगलादेश अशा अनेक सीमांवर भारताला त्रासदायक ठरणाऱ्या हालचाली होत असतात. परीणामी भारताला स्वताच्या सीमा प्रदेशांचे संरक्षण करण्याबरोबरच संरक्षण खर्चही वाढवावा लागत आहे. पण तरीही आपला देश शांततापूर्ण मार्गाने प्रत्येक शेजारी देशाशी सलोख्याचे संबंध जोडून समर्थपणे उभा आहे.

**संदर्भग्रंथसूची**


- मनिषा टिकेकर 2019 भारत आणि भारताचे शेजारी साधना प्रकाशन पुणे
- राजीव सोकरी 2017 भारताच्या परराष्ट्र धोरणाचा विचार : आव्हाने आणि नीती सेज पब्लिकेशन्स पुणे
- आनंद पाटील सप्टें 2013 संपादकीय स्पर्धा परीक्षा नोकरी संदर्भ स्टडी सर्कल पब्लिकेशन्स पुणे
- https://www.google.com/amp/s/www.orfonline.org/marathi/
- https://www.wikiwand.com/mr
- प्रवीण चौगुले मे 07 2016 भारत आणि शेजारील देश दैनिक लोकसत्ता (करिअर वृत्तांत).

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer- peer-Reviewed& Refereed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## August -2021

ISSUE No- (CCCXI) 311

## WOMEN'S EMPOWERMENT : ISSUES & CHALLENGES

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr. Nilima D. Deshmukh**
Editor
**Principal**
Sahakar Maharshi Late Bhaskarrao Shingne
Arts College, Khamgaon, Dist. Buldana

**Dr. Archana S. Dahane**
Editor
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya, Seloo

## Aadhar International Publication

For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

## INDEX- 311


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Personal laws and Property Right of Women in India– Gender Equality or Gendered Equality **Dr. Sindhu Thulaseedharan** | 1 |
| 2 | Literature and Women's Empowarment **Taterao Bapurao Nikalje** | 6 |
| 3 | Women's Empowerment : Issues & Challenges **Miss. Manjusha Kolhe** | 9 |
| 4 | Women's contribution in Indian Freedom movement **Dr. Prakash Maruti Tekale** | 12 |
| 5 | Indian Women Problems and Remedies for their Holistic Development **Dr. Anil M. Tirkar** | 17 |
| 6 | Problems of Indian Women & Some Suggestions **Dr. Wasudeo D. Golait** | 21 |
| 7 | Women empowerment: Special reference to women rights **Ramshankar Varma** | 25 |
| 8 | Women Empowerment Through Indian Constitution **Chaitanya A. Ghuge / Unmesh A. Ghuge** | 30 |
| 9 | The Voice of Marginalized Women in Anita Nair's Novel's Ladies Coupe **Manohar A. Wasnik** | 33 |
| 10 | The Role Of Women Entrepreneurship In Small Socity **Mangalavati G. Pandey** | 37 |
| 11 | 73rd and 74th Constitutional Amendment Act and Political Empowerment of Women **Dr. Arun Pentawar** | 41 |
| 12 | Problems and Prospects of Women Entrepreneurs in India **Dr. S. K. More** | 45 |
| 13 | Physical Education & Women Empowerment **Dr. Jayawant Mane** | 50 |
| 14 | Women's Empowerment - Issues and Challenges **Nandkishor Madhavrao Moghekar** | 55 |
| 15 | Women Entrepreneur In Indian Perspectives **Dr.Suresh Namdeo Gawai** | 61 |
| 16 | Gram Panchayat as Change Agents to Encourage Women Empowerment in India: An Overview **Pradeep Adhikary** | 66 |
| 17 | Women's Empowerment: Issues and Challenges with special Reference to Women's Empowerment through Human Rights. **Dr.P.E.Bhosle** | 71 |
| 18 | Corona Epidemic :-Special Reference to hospital Sisters Empowement **Dr. Banjara Dilip Lalu** | 76 |
| 19 | Women Empowerment & NGOs **Dr. Prassanajeet R. Gawai** | 79 |
| 20 | Occidental and Oriental Approaches to Women empowerment: An Analysis **Dr. Shaikh M A Raheman** | 82 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 311(CCCXI)
ISSN : 2278-9308
August, 2021

# 73rd and 74th Constitutional Amendment Act and Political Empowerment of Women

**Dr. Arun Pentawar**
Head, Dept. of Political Science Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon ,Emil; arunpentawar@gmail.com Mb. 9067449988

**Abstract:**

The 73rd and 74th Constitutional Amendment Acts, 1992, through which self-governance at local level was introduced in the form of a three-tier system of Panchayats at the village, intermediate and district levels and Municipalities in urban India, reserved one-third (33 per cent) seats for women both in reserved and unreserved categories and also in the offices of the chairpersons on rotation basis. These two amendments eased women's entry in politics and their empowerment as women got included in the governance and policy making process and there are lakhs of women who got elected to Panchayats and municipalities due to the reservation. The government of Maharashtra announced 50%reservation for women in Panchayat Raj Municipalities in urban India. The women's political participation is important in Panchayat Raj as it is backbone of Indian democracy.

**Keywords:** Panchayat Raj, 73rd and 74th Constitutional Amendment, Political Empowerment, Women Empowerment etc.

## Introduction

The women's political participation is important in Panchayat Raj as it is backbone of Indian democracy. The government of Maharashtra announced 50%reservation for women in Panchayat Raj. No one can deny benefits of it. Panchayat Raj is the gateway to enter in politics at rural level. But will more reservations for women be sufficient to strengthen democracy? In 2011, Maharashtra government has announced fifty parent reservations for women in Panchayat raj. The most awaited and popular decision is welcomed by all, especially by women. The forthcoming elections are going to see the effects of this announcement. The election equations are surely going to change. The forthcoming elections in Maharashtra are going to decide the future of Zilla Parishads, Panchayat Samiti, Municipal Corporations and Municipal Councils. The 50% seats are going to be reserved for women. The passage of the Women's Reservation Bill in Rajya Sabha on 9th March 2010 was also a landmark in the history of women empowerment. The 73rd and 74th amendments are historic landmarks for women participation. It introduces 33%reservation for women in local bodies. But the country in which women population is nearly 50%, should reserve same percentage in political institutions, and is a simple logic. The union cabinet had declared 50% reservations for women in Panchayat Raj. It decided amendment in article 243 –D for the same. The reservations for women are changing the face of male-dominated mainstream politics in India. The elections are important not only for women voters but also for women candidates. The decision of Maharashtra government will surely affect grassroots politics in state. Once again there is need to focus on current happenings.

## Objectives:

The basic objective of the paper is:

1) To determine the *73rd and 74th Constitutional Amendment Act.*
2) To know the study of *Political Empowerment of Women in Panchayat Raj*

## Research Methodology & Sources:

The proposed study mainly is descriptive in nature. The research paper done is based on secondary data. Here, the data from various research journals, books, websites and articles are

collected in order to understand the *73rd and 74th Constitutional Amendment Act and Political Empowerment of Women in Panchayat Raj.*

**Limitations of Study**

The paper is based on analysis of the subject and does not involve any findings based on primary study by the researcher.

**73rd and 74th Constitutional Amendments**

73rd and 74th Constitutional Amendments were passed by Parliament in December, 1992. Through these amendments local self-governance was introduced in rural and urban India. The Acts came into force as the Constitution (73rd Amendment) Act, 1992 on April 24, 1993 and the Constitution (74th Amendment) Act, 1992 on June 1, 1993. These amendments added two new parts to the Constitution, namely, 73rd Amendment added Part IX titled "The Panchayats" and 74th Amendment added Part IXA titled "The Municipalities". The Local bodies–'Panchayats' and 'Municipalities' came under Part IX and IXA of the Constitution after 43 years of India becoming a republic.

**Salient Features of the 73rd and 74th Constitution Amendment Acts**

Panchayats and Municipalities will be "institutions of self-government"

1. Basic units of democratic system-Gram Sabhas (villages) and Ward Committees (Municipalities) comprising all the adult members registered as voters.
2. three-tier system of panchayats at village, an intermediate block/taluka/mandal and district level except in States with population is below 20 lakhs (Article 243B).
3. Seats at all levels to be filled by direct elections [Article 243C (2)].
4. Seats reserved for Scheduled Castes (SCs) and Scheduled Tribes (STs) and chairpersons of the Panchayats at all levels also shall be reserved for SCs and STs in proportion to their population.
5. One-third of the total number of seats to be reserved for women. Onethird of the seats reserved for SCs and STs also reserved for women. One-third offices of chairpersons at all levels reserved for women (Article 243D).
6. Uniform five year term and elections to constitute new bodies to be completed before the expiry of the term. In the event of dissolution, elections compulsorily within six months (Article 243E).
7. Independent Election Commission in each State for superintendence, direction and control of the electoral rolls (Article 243K).
8. Panchayats to prepare plans for economic development and social justice in respect of subjects as devolved by law to the various levels of Panchayats including the subjects as illustrated in Eleventh Schedule (Article 243G).
9. 74th Amendment provides for a District Planning Committee to consolidate the plans prepared by Panchayats and Municipalities (Article 243ZD).
10. Funds: Budgetary allocation from State Governments, share of revenue of certain taxes, collection and retention of the revenue it raises, Central Government programmes and grants, Union Finance Commission grants (Article 243H).
11. Establish a Finance Commission in each State to determine the principles on the basis of which adequate financial resources would be ensured for panchayats and municipalities (Article 243I).

**Concept of Empowerment**

Empowerment of women would mean equipping women to be financially independent, self-reliant, have positive attitude to enable them to face any tough situation and they should be able to participate in developmental activities. John Show International JSI express empowerment in a behavioural sense as the ability to take effective decision encompassing inner state (sense of self, of one's autonomy, self-confidence, openness to new ideas, belief in one's own potential to act effectively) and a person's position and efficiency in social interactions. In short, it is the ability to make and carry out important decisions affecting one's own life and the lives of others.

ISSN : 2278-9308
August, 2021

Therefore it can be stated that change in political culture, change in attitude of political parties, change in the outlook of both men and women will go long way in ensuring equal participation of women at urban local level.

**Political Empowerment of Women**

Mahatma Gandhiji would have insisted upon women's equal participation and devotion of power to the institutions of local Self-Governance and the Village Panchayat. The Panchayat Raj Act provides for people's active participation in the local administration by granting them power to question and by requesting their participation in planning for development of their villages. The Self-Help Group women are mentally ready now and have moral courage to contest the local and Legislative election. There is every possibility that the growth of Self-Help Group in the future will provide large number of women leaders in India. The Government of India, the State Governments and many international agencies like the International Labour Organization (ILO) and UNICEF have been involved in developing programmes to deal with child labour. Using the Self-Help Group to empower the mother and the child for the eradication of child labour is being given serious thought. The processes have been going on for the last few years and as of now 384 Self Help Groups have been formed for eradication of child labour. The 73rd and 74th Amendments (1993) to the Indian Constitution is considered as a breakthrough towards ensuring equal access and increased participation in political power structure for women.

**New Panchayat Raj Institutions**

The 73th and 74th Amendments (1993) of the Indian Constitution have served as a breakthrough towards ensuring equal access and increased participation in political power structure for women. The PRIs play a central role in the process of enhancing women□s participation in public life. The PRIs and the local Self Governments are actively involved in the implementation and execution of the National Policy for Women at the grassroots level.

**73rd and 74th Constitutional Amendment: historical milestone for women's political participation**

To protect the interests of the disadvantaged segments of the population, notably women, the scheduled castes (SC) and the scheduled tribes (ST), and to ensure their participation in democratic decentralization process, the 73rd and 74th Constitutional Amendments was passed with the provision of reservation on 23rd April 1993. The Act reserved one-third of all seats in the local self-governing bodies 9 for rural (all three levels of Panchayats) and urban areas (Municipal body) respectively for women and reservation for SC/STs proportionate to their population. Though reservation for SCs and STs are in place in other elected bodies (national and state legislative assembles), the 73rd Amendment is the first one in India that mandated women's reservation in local body election. Article 243D of 73rd Constitutional Amendment Act covers, in detail, the manner in which reservations are to be provided to women and others belonging to the SC/STs in the local Panchayat election at all three levels.

**Reservations to elected seats are mandated by the Constitution in the following pattern**

i) One-third of the total numbers of seats to be filled by direct election in every Panchayat are to be reserved for women. This is inclusive of the reservation provided for women belonging to the SC/STs (Article 243D (3))

ii) Within the reservation provided for persons belonging to the SC/STs as detailed above, not less than one-third of the total number of seats that are reserved for different categories in each Panchayat are to be reserved for women belonging to the SC/STs (Article 243 D (2))

iii) These seats may be allotted by rotation to different constituencies within a Panchayat (243D (1) and (3)).

**Conclusions:**

- The women's political participation is important in Panchayat Raj as it is backbone of Indian democracy.
- Most of the women enter politics without any political experience.
- Politics is male dominated and women are discriminated. Women have to carry dual responsibilities after being elected.
- Though most of the women have political familial background, .all cannot be considered as proxies. Some prove themselves and can be tanned as 'political wives.'
- The overall change in the attitude of political parties towards women leaders is essential. Training is extremely essential for women Corporates especially newcomers.
- Training should not be just formal, procedural training but must expose them to the concepts of freedom, gender equality etc.
- Reservation is not an end itself. Conducive environment must be created in political institutions to enable them to carry their responsibilities effectively

**References:**


- Pandya, Shefali, 'Research methodology', APH Publishing Corporation, New Delhi, 2012.
- Nanivadekar, Medha, Partners in Politics, Competing in Crime - Fallout of Women's reservations in Maharashtra~ New Delhi: Manushi, Issue No. 137, June/July 2003.
- Mohan, Shantha and Others, Baseline report - Women and Political Participation in India, Bangalore: National Institute of Advanced Studies-Gender Studies Unit (NIAS): Women's Voice, National Alliance of Women (NAWO) and Initiatives- Women in Development (IWID), 2005.
- https://panchayat.gov.in/reservation-of-women-in-pris
- https://www.thehindu.com/news/national/other-states/Maharashtra-Assembly-approves-50-quota-for-women-in-local-bodies/article14683126.ece
- https://www.pbrdp.gov.in/documents/6205745/98348119/

Sahakar Maharshi Late Bhaskarrao Shingne Smruti Arogya & Shikshan Prasarak Mandal's

**SAHAKAR MAHARSHI LATE BHASKARRAO SHINGNE ARTS COLLEGE, KHAMGAON, DIST. BULDANA**

Yeshwant Rural Education Society's

**YESHWANT MAHAVIDYALAYA, SELOO, DIST. WARDHA**

***Jointly Organised***

**Impact Factor – 7.675**

**ISSN – 2278-9308**

**One Day National Interdisciplinary E-Conference on**

# WOMEN'S EMPOWERMENT : ISSUES & CHALLENGES

## *Certificate of Publication*

*This is to certify that Prof./Dr./ Mr./Mrs./Ms.* **Dr. Arun Pentawar**

*of* **Head, Dept. of Political Science Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon** ,Emil;

*has published a paper on* **73rd and 74th Constitutional Amendment Act and Political Empowerment of Women**

*in B. Aadhar Peer Reviewed & Referred Multidisciplinary International Indexed Research Journal Special Issue on "Women's Empowerment : Issues & Challenges"*

*published on Dated 27th Aug. 2021.*

**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social Research &
Development Training Institute, Amravati

**Dr. Archana S. Dahane**
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya, Seloo

**Dr. Nilima D. Deshmukh**
Principal
Sahakar Maharshi Late Bhaskarrao Shingne
Arts College, Khamgaon, Dist. Buldana

**Mr. Gopal S. Rakhonde** | **Dr. Sandip B. Kale** | **Mr. Arjun N. Khobragade** | **Mr. Sandip A. Lande**

ISSN 2319 - 359X

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# IDEAL

Volume - X Issue - I September - February - 2021-22

English / Marathi / Hindi Part - I

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47026

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.601
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | मानवी हक्क आणि मानवी हक्कांच्या संदर्भात भारतातील परिस्थितीचे विश्लेषण<br>**डॉ. अरुण पेंटावार** | १-९ |
| २ | औरंगाबाद तालुक्यातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर सोशल नेटवर्किंगमुळे होणाऱ्या परिणामांचा अभ्यास<br>**भारत मारोती दळवी** | १०-१६ |
| ३ | प्रज्ञा दया पवार यांच्या लेखनातील वैचारिकता<br>**डॉ. छाया हरिभाऊ कदम-पवार** | १७-२१ |
| ४ | भारतीय राज्यघटना आणि महिला सक्षमीकरण<br>**प्रा. संबोधी एम. देशपांडे** | २२-२६ |
| ५ | संत एकनाथ महाराज यांचे सामाजिक विचार<br>**कु. शिवरानी गणपत धनगे**<br>**प्रा. डॉ. संतोष खंडोबा चव्हाण** | २७-३२ |
| ६ | गीत भीमायन : एक समाज-सांस्कृतिक-संगीत ठेवा<br>**विद्या गौतम धनेधर** | ३३-३५ |

# १. मानवी हक्क आणि मानवी हक्कांच्या संदर्भात भारतातील परिस्थितीचे विश्लेषण

**डॉ. अरुण पेंटावार**
राज्यशास्त्र विभागप्रमुख, सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव.

*सारांश*

*मानवी हक्क ही संकल्पना एक व्यापक स्वरूपाची असून स्त्री पुरुष यांना एक माणूस म्हणून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यासाठी मानवी हक्क गरजेचे आहेत. प्राचीन काळापासुन ते आधुनिक काळातही प्रत्येक राष्ट्राने मानवी हक्कांना विशेष महत्व दिलेले आहे. भारतामध्ये मानवी हक्कांच्या संदर्भात घटनेमध्ये व्यापक तरतुदी करण्यात आलेल्या आहेत व सर्वांना समान हक्क बहाल करण्यात आलेल्या आहेत. याशिवाय न्यायव्यवस्थेचेही योगदान अतिशय महत्त्वपूर्ण आहे. भारतीय संविधानातच मानवी हक्कांच्या संरक्षणाची व अंमलबजावणीची जबाबदारी ही न्यायव्यवस्थेवर सोपविलेली आहे. तसेच मानवी हक्कांच्या संरक्षणात व अंमलबजावणीत भारतातील घटनात्मक व कायदेशीर संस्था म्हणजेच राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, राज्य मानवाधिकार आयोग आणि मानवाधिकार न्यायालये यांच्यासह इतर अनेक अराजकीय संघटनांची भूमि का तेवढीच महत्वाची आहे.*

**Key Words:** मानवी हक्क, राज्यघटना, न्यायपालिका, मानवी हक्क आयोग इ.

**प्रस्तावना**

मानवी हक्क म्हणजे प्रत्येक माणसाला असणारे निसर्गदत्त मूलभूत हक्क होय. हे हक्क त्याला जन्मतःच मिळतात. त्याचे कारण मनुष्यप्राणी हासुद्धा पक्षी, प्राणी किंवा समुद्री जिवांसारखा स्वातंत्र्य घेऊनच जन्माला आलेला आहे आणि स्वतंत्रतेला संलग्न काही मूलभूत अधिकार प्रत्येकाला असतात, या विचाराला जगभर मिळालेली मान्यता होय. पण, ही मान्यता सहजासहजी मिळालेली नाही. माणसाने त्यासाठी मोठा संघर्ष केला आहे. प्राचीन काळापासुन ते आधुनिक काळातही प्रत्येक राष्ट्राने मानवी हक्कांना विशेष महत्व दिलेले आहे. अलीकडील काळामध्ये मानवी हक्कांना विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. यामध्ये मानवी हक्कांच्या संरक्षणाची जाणीव एकीकडे विकसित होत असतानाच दुसरीकडे मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या घटनाही वाढत आहेत. मानवी हक्क हा राष्ट्र राष्ट्र मधील परस्पर संबंधाचा आधार बनला आहे. इतर महत्वाच्या घटना बरोबरच मानवी हक्कांना ही विशेष प्राधान्य देत आहेत. एखाद्या राष्ट्राची आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रतिष्ठा ही त्या राष्ट्रातील मानवी हक्कांच्या दर्जावरून ठरत आहे. राष्ट्रा-राष्ट्रामधील आणि आंतरराष्ट्रीय संघटना मधील चर्चेच्या केंद्रस्थानी सुध्दा मानवी हक्कांच्या संरक्षणाचा मुद्दा महत्त्वाचा ठरत आहे. त्याच आधारावर अनेक राष्ट्रांमध्ये मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी

बहुतांशी राष्ट्रांमध्ये घटनात्मक तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. भारतातही मानवी हक्कांची तरतूद संविधानात करण्यात आलेली आहे व त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी ही न्यायव्यवस्था आणि मानवी हक्क आयोग यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे. प्रस्तुत शोधनिबंधाचे च्या माध्यमातून मानवी हक्क आणि भारतीय न्यायव्यवस्थेचे योगदान व मानवी हक्कांच्या संदर्भात भारतातील परिस्थितीचे विश्लेषण यांचा आढावा घेण्यात आलेला आहे

**शोधनिबंधाची उध्दिष्टे**

1. मानवी हक्क संकल्पनेचा अभ्यास करणे.
2. मानवी हक्कांच्या संदर्भात भारतातील परिस्थितीचा आढावा घेणे.

**संशोधन पध्दती व स्त्रोत**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. तथ्य संकलनासाठी व्दीतीय स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. यात प्रामुख्याने संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, वर्तमान पत्र, संशोधन पत्रिका, व विविध वेबसाईट वरील माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे.

**मानवी हक्कांचा अर्थ**

मानवी हक्क ही संकल्पना एक व्यापक स्वरूपाची असून यामध्ये जीवन जगण्याचा हक्क, स्वातंत्र्य, समता, सुरक्षेचा हक्क, विचार स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, न्याय मिळविण्याचा हक्क, सामाजिक, राजकीय व आर्थिक या सर्व स्तरावरील हक्कांचा समावेश होतो. स्त्री पुरुष यांना एक माणूस म्हणून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यासाठी मानवी हक्क गरजेचे आहेत. प्रामुख्याने मानवी हक्कांचे वर्गीकरण नैसर्गिक सामाजिक राजकीय आर्थिक व सांस्कृतिक असे केले जाते.

**मानवी हक्कांची वाटचाल**

मानवी हक्कांची संकल्पना ही अतिशय प्राचीन आहे. प्राचीन ग्रीक नगर राज्यापासून ते आधुनिक राष्ट्र-राज्य व्यवस्थेपर्यंतचा त्याचा विकास झालेला आहे. ग्रीकांनी मानवी हक्क ही निसर्गाची देणगी आहे असे म्हटले आहे. तर स्टाइक या विचारवंताने सुद्धा नैसर्गिक कायद्यातून नैसर्गिक हक्कांचा जन्म होतो असे म्हटले आहे. तसेच रोमन विचारवंत सिसेरो यांनीसुद्धा नैसर्गिक हक्काचे समर्थन केले आहे. असे असले तरी मध्ययुगीन काळाच्या अखेरीसच मानवी हक्क व स्वातंत्र्य यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले.

आधुनिक काळात हॉब्ज, लॉक व रूसो या सामाजिक करारवादी विचारवंतांनी आपल्या सिद्धांतांच्या माध्यमातून मानवी हक्कांची संकल्पना विशद केली. त्यांच्या या विचारांमधून फ्रेंच राज्यक्रांती घडून आली. फ्रेंच राज्यक्रांती व अमेरिकन स्वातंत्र्यसंग्रामातील नेत्यांनी मानवी हक्कांचा स्वीकार केला. त्याचबरोबर यूरोपमध्ये नागरी हक्क आणि नागरी कायदे यासारख्या विषयावर चर्चा होऊ लागली. यातूनच पुढे चालून मानवी हक्कांच्या विचारांना चालना मिळाली.

विसाव्या शतकात झालेल्या पहिल्या व दुसऱ्या महायुद्धामुळे मोठ्या प्रमाणात मानवी जीवित हानी झाली. याचा परिणाम म्हणजे 10 जानेवारी 1920 रोजी राष्ट्रसंघाची, तर 24 ऑक्टोबर 1945 रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना झाली. यामध्ये राष्ट्रसंघाला अपयश आले. त्यामुळे संयुक्त राष्ट्र संघाने महायुद्ध व मानवी हानी टाळण्यासाठी आपल्या युनोच्या सनदमध्ये जागतिक शांतता आणि मानवी सुरक्षितता याला विशेष महत्त्व देण्यात आले.

मानवी सुरक्षिततेच्या संदर्भातून मानवी हक्कांचा विचार करण्यात येऊ लागला. याच दृष्टिकोनातून मानवी हक्कांना सुरक्षितता प्राप्त करून देण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेने 10 डिसेंबर 1948 रोजी मानवी हक्कांचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यानंतर मानवी हक्क या संकल्पनेला जागतिक महत्त्व प्राप्त झाले. युनोने आज पर्यंत मानवी हक्कांच्या विविध पैलूंवर अनेक ठराव पास केले तसेच काही नियम व करारही बनविलेले आहेत. सध्या युनोचे एकूण 193 सदस्यराष्ट्र असून या राष्ट्रांना मानवी हक्कांची तरतूद आपल्या संविधानात करावे आपल्या राष्ट्रातील मानवी हक्कांची अंमलबजावणी करावी तसेच मानवी हक्कांच्या संदर्भातील युनोच्या सर्व तरतुदींचे पालन करावे असेही आवाहन करण्यात आले आहे.

**मानवी हक्कांच्या संदर्भात भारतातील परिस्थितीचे विश्लेषण**

भारत हा संयुक्त राष्ट्र संघटनेचा संस्थापक सदस्य राष्ट्रांपैकी एक आहे. युनो मार्फत मानवी हक्कांच्या संदर्भात करण्यात आलेल्या आवाहनास प्रतिसाद देताना भारताने आपल्या संविधानातच मानवी हक्कांची तरतूद केलेली आहे. घटनाकारांनी एका उत्कृष्ट घटनेची निर्मिती करताना त्यात स्त्री-पुरूषांना समान हक्क प्रदान केलेले आहे. भारतीय घटनेच्या घटनेचा सरनामा, मूलभूत अधिकार कलम 14 ते 32 आणि मार्गदर्शक तत्वे कलम 37 ते 51 यामध्ये मानवी हक्कांची सविस्तर तरतूद करण्यात आली आहे. घटनेमध्ये मानवी हक्कांची तरतूद केल्यानंतरही सन 1993 मध्ये "प्रोटेक्शन ऑफ ह्युमन राइट्स अॅक्ट 1993" हा कायदा करून भारतातील स्त्री-पुरुषांच्या अधिकाऱ्यांना संरक्षण देण्याचा प्रयत्न केलेला आहे. यामध्ये महिला हक्कांच्या संदर्भात तर विशेष जागृकता घेण्यात आली आहे. यासोबतच सन 1998 साली राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. आज भारतात अनेक राज्यांमध्ये राज्य मानवाधिकार आयोग अस्तित्वात आहे. या आयोगाच्या माध्यमातून भारतामध्ये मानवी हक्कांच्या प्रश्नांचे निवारण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मानवी हक्कांच्या संदर्भातील भारतातील परिस्थितीचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे.

**भारतात मानवी हक्क राबविण्याची आणि त्यांचे संरक्षण करण्याची यंत्रणा**

भारतामध्ये मानवी हक्कांच्या अंमलबजावणीसाठी व संरक्षणासाठी घटनात्मक आणि वैधानिक उपाय करण्यात आले आहे. याशिवाय राष्ट्रीय मानवी हक्क आयोग राष्ट्रीय महिला आयोग, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग, राष्ट्रीय मागासवर्ग आयोग, राष्ट्रीय

अल्पसंख्यांक आयोग इत्यादी आयोगामार्फत मानवी हक्कांचे संरक्षण व अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच, अनेक स्वयंसेवी संस्थासुद्धा मानवाधिकार संरक्षणाच्या क्षेत्रात कार्यरत आहे.

**1. मानवी हक्कांचे भारताच्या संविधानातील प्रतिबिंब**

भारतीय राज्यघटनेचा सरनामा, मूलभूत हक्कांचा भाग तिसरा आणि राज्यांच्या धोरणविषयक मार्गदर्शक तत्वांचा भाग चौथा हा राज्यघटनेचा गाभा आहे. त्यांचा एकत्रित विचार केल्यास त्यामध्ये मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा, नागरी आणि राजकीय हक्क त्याचबरोबर आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा करारनामा यांचे प्रतिबिंब पडलेले दिसते. राज्यघटनेतील मूलभूत कर्तव्ये नमूद करणारा भाग चार 'अ' महत्त्वाचा आहे; कारण, हक्क हे कर्तव्याशिवाय अपूर्ण असतात. आपल्या राज्यघटनेच्या शाश्वत संदेशाचे सार 'सर्व मानवजात जन्मत:च मुक्त आणि समान असते' हेच आहे. भारताने मानवी अधिकारांच्या जागतिक जाहीरनाम्याच्या निर्मितीमध्ये सक्रिय भाग घेतला होता. भारताने अनेक मूलभूत आंतरराष्ट्रीय मानवाधिकार करारांवर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

**2. मूलभूत हक्क आणि घटनात्मक उपाययोजनेचा हक्क :**

भारतीय राज्यघटनेने नागरिकांना सहा मूलभूत हक्क दिलेले आहेत. समतेचा हक्क (कलम 14 ते 18) स्वातंत्र्याचा हक्क (कलम 19 ते 22) शोषणाविरुद्धचा हक्क (कलम 23 आणि 24) धर्मस्वातंत्र्याचा हक्क (कलम 25 ते 28) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क ( कलम 29 ते 30) घटनात्मक उपाययोजनेचा हक्क (कलम 32). भारतीय राज्यघटनेच्या कलम 32 प्रमाणे मूलभूत हक्कांवर कोणत्याही प्रकारे गदा आल्यास घटनात्मक उपायांचा हक्क देण्यात आला आहे. कारण या हक्कांना संरक्षणात्मक हमी नसेल तर त्या हक्कांना काहीही अर्थ उरत नाही. त्यामुळे घटनेने दिलेल्या मूलभूत हक्कांवर गदा आल्यास दाद मागण्याचा अधिकार घटनेनेच दिला आहे.

व्यक्तीच्या या मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास घटनेच्या 'कलम 32' मध्ये घटनात्मक उपायांचा हक्क देण्यात आला आहे. उल्लंघन झालेले मूलभूत हक्क सर्वोच्च न्यायालयाकडून पुन्हा प्राप्त करून घेण्याचा हक्कदेखील मूलभूत हक्क म्हणून घटनेत नमूद करण्यात आला आहे. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कलम 32 ला भारतीय राज्यघटनेचा आत्मा असे म्हटले आहे.

**3. मानवी हक्क आणि सर्वोच्च न्यायपालिका**

भारतीय संघराज्यात एकात्म व एकेरी स्वरूपाची न्याय व्यवस्था स्वीकारली गेली आहे. १९३५ च्या कायद्यान्वये स्थापन केलेल्या फेडरल कोर्ट ऑफ इंडिया याचे नवीन रूप म्हणजे सर्वोच्च न्यायालय होय. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार फारच व्यापक आहेत. जगातील कोणत्याही देशातील सर्वोच्च न्यायालयापेक्षा भारताच्या सर्वोच्च न्यायालयाला जास्त अधिकार प्राप्त झाले आहेत.

राज्यघटनेच्या ३२ कलमान्वये सर्वोच्च न्यायालय मूलभूत अधिकारांचे संरक्षक आहे. त्यामुळे शासनाच्या कोणत्याही कायद्याने अगर आज्ञेने जर कोणत्याही नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर आक्रमण

झाले असेल तर तो नागरिक अथवा इतर नागरिक सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागू शकतो. घटनेतील मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसाठी सर्वोच्च न्यायालय आवश्यकतेनुसार बंदी प्रत्यक्षीकरण (Habeas Corpus), परमादेश (Mandamus), प्रतिबंध (Prohibition), अधिकार पृच्छा (Quo Warrant), उत्प्रेक्षण (Certiorari)चे आदेश देऊ शकते. परंतु, असे आदेश फक्त मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसाठीच काढता येतात

4. राष्ट्रीय मानवी हक्क आयोग

मानवी हक्कांच्या प्रभावी संरक्षणासाठी 'मानवी हक्क संरक्षण कायदा 1993' मध्ये संमत करण्यात आला. या कायद्यामध्ये राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, राज्य मानवाधिकार आयोग आणि मानवाधिकार न्यायालय यांच्या स्थापनेची तरतूद करण्यात आली आहे. यानुसार राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची स्थापना 12 ऑक्टोबर 1993 रोजी करण्यात आली. 'युनिव्हर्सल डिक्लरेशन ऑफ ह्युमन राइट्स' आणि भारतीय राज्यघटना या दोहोंच्या मुळे आपल्या मानवी हक्कांचा पाया घट्ट झाला आहे. या प्रस्तावनेला अनुसरून अनेक कायदे आपण स्वातंत्र्योत्तर काळात केले. त्यांचा उद्देशच मुळी जनतेला विविध अधिकार देण्याचा होता. त्या अधिकारांचे संरक्षणसुद्धा सरकारचेच कर्तव्य आहे. परंतु, असे जरी असले तरी १९९३ पर्यंत मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी वेगळी अशी यंत्रणा नव्हती. मंत्रालये मग ती सामाजिक न्याय मंत्रालय असोत किंवा महिला कल्याण मंत्रालय असो, मंत्रालये स्वतःहून वेगवेगळ्या प्रकारचे कायदे संसदेमार्फत मंजूर करून घेतात. पण, त्या कायद्याची अंमलबजावणी होत असताना किंवा होत नसल्यामुळे मानवी हक्कांच्या हननाच्या घटनांवर उपाययोजना मात्र नव्हती. शेवटी 1993 मध्ये भारताच्या संसदेने 'नॅशनल ह्युमन राइट्स प्रोटेक्शन ॲक्ट' मंजूर केला. त्या कायद्यान्वये आज आपल्याला मानवी हक्कांच्या संरक्षणाची एक चौकट उपलब्ध झालेली आहे. या कायद्यान्वये 12 ऑक्टोबर 1993 रोजी 'नॅशनल ह्युमन राइट्स कमिशन' म्हणजे 'राष्ट्रीय मानवी हक्क आयोगा' ची स्थापना झाली आणि त्याचबरोबर सर्व राज्यांत राज्य मानवी हक्क आयोगांची स्थापना झाली.

महाराष्ट्रातही 6 मार्च 2001 ला राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगांचे मुख्य काम जिथे जिथे मानवाधिकाराचे हनन होते, त्या ठिकाणी हस्तक्षेप करायचा, त्याला जबाबदार लोकांचे उत्तरदायित्व प्रस्थापित करायचे आणि अशाप्रकारे ज्या लोकांवर अत्याचार झाला असेल किंवा ज्यांच्या मानवाधिकारांचे हनन झाले असेल, त्या लोकांना नुकसानभरपाईची शिफारस करायची.त्याचबरोबर ज्या यंत्रणांमुळे किंवा ज्या यंत्रणांच्या हलगर्जीपणामुळे अशा प्रकारच्या अधिकारांचे हनन झाले; त्या सरकारी यंत्रणांनादेखील जाब विचारणे, हेही आयोगांचे काम आहे. या कायद्यानुसार मानवाधिकार म्हणजे 'भारताच्या घटनेने दिलेल्या आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या वेगवेगळ्या करारानुसार उपलब्ध असलेले सर्व अधिकार' अशी व्याख्या करण्यात आलेली आहे. या कायद्याने मानवाधिकार आयोगाला कोणते अधिकार दिलेले आहेत, हे पाहणे महत्त्वाचे आहे. सर्वप्रथम मानवाधिकाराच्या हननाची

चौकशी हे आयोग करू शकते. याबाबत कोणत्याही व्यक्तीला किंवा कोणत्याही व्यक्तीच्या वतीने अन्य व्यक्तीलाही तक्रार दाखल करता येते. आयोग स्वतःदेखील वृत्तपत्रात आलेल्या बातमीवरून किंवा अन्य मार्गानी आयोगाला कळालेल्या गोष्टींची दखल घेऊन संबंधितांना आदेश देऊ शकते. अशा प्रसंगी हा आयोग मानवी हक्क्कांच्या उल्लंघनाची चौकशी सुरू करून जबाबदार यंत्रणेला योग्य पावले उचलण्याचा आदेश देऊ शकते. थोडक्यात, नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करण्याची भूमिका आयोगाकडे आहे.

5. राष्ट्रीय अनुसूचित जाती-जमाती आयोग

1950 साली अस्ति त्वात आलेल्या अनुसूचित जाती व जमाती कार्यालयात मदत करण्यासाठी 1978 मध्ये बहुसदस्यीय अनुसूचित जाती-जमाती आयोगाची स्थापना करण्यात आली. पुढे 2003 साली झालेल्या 89 व्या घटना दुरूस्तीअन्वये 338 क या नव्या कलमानुसार 19 फेब्रुवारी 2004 रोजी स्वतंत्र अनुसूचीत जमाती आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगामार्फत अनुसूचित जाती व जमाती अंतर्गत येणा-या जनतेच्या हक्कांचे संरक्षण व संवर्धन करण्याचे कार्य केले जाते. यामध्ये अनुसूचित जाती व जमातीसाठी संविधान व राज्य शासनाकडून उपलब्ध सवलती व हक्कासाठी तरतुदीप्रमाणे सद्यःस्थितीचा अभ्यास करणे व शासनास उपाय सुचविणे. अनुसूचित जाती व जमातीच्या व्यक्तींकडून येणाऱ्या तक्रारींची चौकशी करणे. अनुसूचित जाती व जमातीच्या सामाजिक, आर्थिक विकासाच्या योजना, धोरणनिर्मितीच्या प्रक्रियेत भाग घेऊन शासनास सल्ला देणे व त्या धोरणाचे, योजनांचे मूल्यमापन करणे. अनुसूचित जाती/ जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ व नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५ प्रमाणे दाखल प्रकरणांचा आढावा घेणे. पीडित व्यक्तीस देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्याचा आढावा घेणे. तसेच पोलिसांकडील थकीत चौकशी प्रकरणे किंवा तक्रार दाखल करून न घेतलेल्या बाबींची चौकशी करणे. यासारख्या उपक्रमाव्दारे राष्ट्रीय अनुसूचित जाती-जमाती आयोगा मार्फत मानवी हक्कांचे संरक्षण केले जाते.

6. राष्ट्रीय मागासवर्ग आयोग

मंडल आयोगाच्या शिफारसी लागु केल्याननंतर देशभरात याविरोधात आंदोलने झाली. या निर्णयाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात अनेक प्रकरणे दाखल करण्यात आली यापैकी एका इंदिरा साहनी विरूध्द भारत सरकार या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय मागासवर्ग आयोग स्थापन करण्याचा निर्णय दिला. त्यानंतर भारत सरकाराने 1993 साली राष्ट्रीय मागासवर्ग आयोग स्थापन केला. या आयोगामार्फत इतर मागास वर्गातील लोकांच्या तक्रारीसोडविणे, एखाद्या जातीला इतर मागास वर्गात समावेश करणे किंवा काढून टाकण्याची शिफारस करणे यासह इतर मागासवर्गीय जनसमुहाच्या हक्कांचे संरक्षण करण्याची जबाबदारी हा या राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाची आहे. मोदी सरकारने राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग रद्द करण्याच्या तयारीत असून, त्याऐवजी नवा आयोग स्थापन करणार आहे. राष्ट्रीय सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्गीय आयोग असं या नव्या आयोगाचं नाव असणार आहे. या

निर्णयामुळे 1993 सालापासून कार्यरत असलेल्या राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाची मान्यता रद्द होऊन त्या जागी हा नवा आयोग स्थापन करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या नव्या आयोगाला घटनात्मक दर्जा दिला जाणार आहे.

7. राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग

राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाची स्थापना संसदेने 1992 च्या राष्ट्रीय अल्पसंख्याक कायद्याच्या नियमनाने केली. राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाचे पहिले अध्यक्ष न्यायमूर्ती मोहम्मद सरदार अली खान (1993-1996) होते. भारताच्या गृहमंत्रालयाच्या 12 जानेवारी 1978 च्या ठरावानुसार अल्पसंख्यांक आयोगाची स्थापना करण्यात आली होती, ज्यात विशेषतः नमूद करण्यात आले होते की संविधान आणि कायद्यामध्ये प्रदान केलेले संरक्षण असूनही अल्पसंख्याकांना असमानता आणि भेदभाव वाटतो. धर्मनिरपेक्ष परंपरा कायम ठेवण्यासाठी आणि राष्ट्रीय एकात्मतेला प्रोत्साहन देण्यासाठी, भारत सरकार अल्पसंख्यांकांसाठी सुरक्षा उपाययोजना आणि वेळोवेळी अंमलात आणलेल्या प्रशासकीय योजना, अल्पसंख्यांकांसाठी संविधान, प्रभावी अंमलबजावणीसाठी विशेष भर देत आहे. 1984 मध्ये अल्पसंख्यांक आयोग गृह मंत्रालयापासून विभक्त झाला. अल्पसंख्यांकांना अधिकार आणि संरक्षणापासून वंचित ठेवण्याशी संबंधित विशेष तक्रारींची तपासणी करणे आणि संबंधित अधिकाऱ्यांसमोर अशा बाबी सादर करणे. अल्पसंख्यांकांविरुद्ध कोणत्याही प्रकारच्या भेदभावामुळे उद्भवणाऱ्या समस्यांच्या कारणांचा अभ्यास करणे आणि त्या सोडवण्यासाठी उपायांची शिफारस करणे. अल्पसंख्याकांच्या सामाजिक-आर्थिक आणि शैक्षणिक विकासाशी संबंधित विषयांचा अभ्यास, संशोधन आणि विश्लेषणाची व्यवस्था करणे. अशाप्रकारे अल्पसंख्यांकांच्या हक्कांचे संरक्षण करण्याची जबाबदारी या आयोगाची आहे.

8. राष्ट्रीय महिला आयोग

राष्ट्रीय महिला आयोग ही भारताच्या संविधानातील तरतुदीनुसार भारत सरकारने 1992 मध्ये स्थापन केलेली वैधानिक संस्था आहे. 1990 च्या राष्ट्रीय महिला आयोग कायद्याद्वारे तिची स्थापना करण्यात आली भारतीय महिला आयोगाने विविध कक्षाची स्थापना केली आहे यामध्ये अनिवासी भारतीय कक्ष, ईशान्य भारत कक्ष, महिला कल्याण कक्ष, महिला सुरक्षा कक्ष आहेत. भारतीय महिलांच्या हक्कांचे प्रतिनिधित्व करणेसाठी आणि त्यांचे मुद्दे व समस्यांविरुद्ध आवाज उठवणे. आयोगाचे अभियान प्रामुख्याने हुंडा, राजकीय, धार्मिक आणि नोकरीच्या ठिकाणच्या महिलांचे प्रतिनिधित्व तसेच श्रमासाठी महिलांचे होणारे शोषण यांचा समावेश आहे. याबरोबरच पोलिसांकडून होणारे महिलांवर अत्याचार आणि वाईट वर्तणूक याचाही समावेश आहे.

आयोगाने वर्कशॉप / कंसल्टेशन, महिलांचे आर्थिक सशक्तीकरण, विशेषज्ञ कमेटीची स्थापना, लैंगिक जागरुकता, कार्यशाळा / सेमिनार आयोजित करणे आणि स्त्री भ्रूण हत्या, महिला हिंसा, इत्यादि जन आंदोलन चालवणे, यासाठी या सामाजिक दुष्कर्माविरुद्ध समाज जागरूकता केली . आयोगाने

लक्षद्वीप वगळता सर्व राज्य / केंद्रशासित प्रदेशांचे दौरे केले आणि 'जेंडर प्रोफाइल' तयार केल्याबद्दल महिला व त्यांचे सशक्तीकरण मूल्यांकन केले.आयोगाच्या स्थापनेसाठी आणि इतर कायदे अंतर्गत महिलांचे संरक्षण करण्यासाठी संबंधित प्रकरणांची तपासणी करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग हे एक वैधानिक मंडळ आहे. या आयोगाची स्थापना 1993 साली करण्यात आली आहे. राज्य महिला आयोग स्वतः तसेच स्वयंसेवी संस्थामार्फत महिलांसाठी कायदा साक्षरता कार्यशाळांचे आयोजन करतो. आयोग जन्मपूर्व लिंग निदान पद्धती (नियम आणि गैरवापर प्रतिबंध) कायदा १९९४ ची कठोर अंमलबजावणी आणि प्रसार माध्यमांतून महिलांच्या प्रतिमेबद्दल असंवेदनशीलता निर्माण करणे, अशा विशिष्ट मुद्द्याबद्दल विशेष दक्ष असतो. आयोग महिलांशी संबंधित विविध मुद्द्यांवर संशोधनात्मक अध्ययन करतो. हा आयोग महिलांशी संबंधित समस्या अधोरेखित करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करतो आणि सेवाभावी संस्थासोबत या समस्यांवर संवाद साधतो. आयोग आणि सेवाभावी संस्थामध्ये अधिक दृढ संबंध निर्माण होण्याकरिता आयोगाकडून "ठिणगी" हे त्रैमासिक बातमीपत्रक मराठी आणि इंग्रजी भाषांमध्ये प्रकाशित केले जाते.

9. भारतातील स्वंयसेवी संस्थेमार्फत मानवी हक्क चळवळ

भारतामध्ये 1936 साली स्थापन झालेली भारतीय नागरी स्वातंत्र्य संघटना (Indian civil Liberties Union) ही प्रसिद्ध मानवी हक्क संघटना पं. जवाहरलाल नेहरू यांच्या पुढाकाराने स्थापन झाली. 'शासनाला विरोध करण्याचा हक्क,' या हेतूने ही संघटना स्थापन केली गेली होती. तसेच, स्वातंत्र्यपूर्व सामाजिक रुढी, परंपरा, स्पृश-अस्पृश्यता इत्यादींसाठी झालेल्या जन आंदोलनाचा समावेशसुद्धा मानवी हक्कांच्या चळवळीमध्येच करता येतो. महात्मा गांधी, राजा राममोहन राय, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ईश्वरचंद्र विद्यासागर, धों. के. कर्वे इत्यादींनी अस्पृश्यता, सती, बालविवाह, हुंडा यांसारखे स्त्री हक्क, बालहक्क व मानवी हक्कांसाठीच विविध लढे उभारले होते.

आज राष्ट्रीय व राज्य मानवी हक्क आयोगाबरोबर देशभरात 200 हून अधिक गैरसरकारी (स्वयंसेवी) संस्था मानवाधिकाराच्या क्षेत्रात कार्य करतात. उदा. People's Union for civil Liberties, Citizens for Democracy, New Delhi इ. तर, आंतरराष्ट्रीय स्तरावर Human Rights watch, New York Amnesty International London, Asia watch New York Centre for Constitutional Rights, New York इ. संस्था कार्यरत आहेत.

लहान मुलांबरोबर काम करणारी CRY (Child Right any you), CACL (Campaign Against Child Labour) YUVN (Youth Voluntary Action, Pune), इ. बालकांच्या हक्कांसाठी, तर, सहेली, साक्षी, चेतना अशा संस्था महिलांच्या हक्कासाठी कार्यरत आहेत.

समारोप

अलीकडील काळामध्ये मानवी हक्कांना विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. यामध्ये मानवी हक्कांच्या संरक्षणाची जाणीव एकीकडे विकसित होत असतानाच दुसरीकडे मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या

घटनाही वाढत आहेत. भारतामध्ये मानवी हक्कांच्या अंमलबजावणीसाठी व संरक्षणासाठी घटनात्मक आणि वैधानिक उपाय करण्यात आले आहे. यामध्ये घटनात्मक तरतुदींसोबतच सर्वोच्च न्यायालय राष्ट्रीय मानवी हक्क आयोग राष्ट्रीय मागास आयोग अनुसूचीत जाती व जमाती आयोग अल्पसंख्यांक आयोग महिला आयोग या संस्था मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी महत्वाच्या यंत्रणा आहेत. लोकांना या संस्थांकडून फार मोठया अपेक्षा आहेत. लोकांच्या जीवनात या संस्थांचे स्थान अमुल्य आहे. भारतामध्ये मोबाईल इंटरनेट सोशल मीडिया यासारख्या माध्यमातून लोकांची मानवी हक्कांच्या बाबतीत जागरूकता वाढत आहे.

**संदर्भग्रंथ सूची**


- कांबळे उध्दव (2020) मानवी हक्क : तत्व आणि दिशाभूल साकेत प्रकाशन पुणे.
- डॉ. लोखंडे भगवान (2020) मानवी हक्क आणि भारत दुर्वा एजन्सी पब्लिकेशन्स पुणे.
- डॉ. पाटील वा भा (2018) मानवी हक्क प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव.
- डॉ. देशपांडे नितीन (2020) मानव संसाधन विकास आणि मानवी हक्क सकाळ प्रकाशन पुणे.
- तुकाराम जाधव (2019) मानवी हक्क द युनिक ॲकॅडमी प्रकाशन पुणे
- प्रा. कुलकर्णी पी. के. (2015) मानवी हक्क आणि सामाजिक न्याय डायमंड पब्लिकेशन्स पुणे
- शेख आमिर (2018) मानवी हक्क व जबाबदाऱ्या निराळी प्रकाशन पुणे
- सबणीस एस एन (2017) मानवी हक्क संरक्षण मुकुंद प्रकाशन नागपुर
- देशपांडे सतीश 4 जानेवारी 2021 मानवी हक्क अक्षरनामा

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - X Issue - IV October - December - 2021

MARATHI PART - I

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47026

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भारतातील आरक्षण: सामाजिक न्याय<br>**डॉ. आप्पासाहेब शामराव शेळके** | १-५ |
| २ | भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षता व सांप्रदायवाद<br>**प्रा. डॉ. अर्जुन जी. येरगे** | ६-१० |
| ३ | भारतीय संविधानातील आरक्षण विषयक तरतूदी<br>**डॉ. अरूण पेंटावार** | ११-१५ |
| ४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर: कायदेतज्ञ व राष्ट्रनिर्माते<br>**प्रा. डॉ. सोनकांबळे अरूण विठ्ठल** | १६-२० |
| ५ | महिलांचा राजकीय सहभाग<br>**डॉ. अरूण महादेव राख** | २१-२४ |
| ६ | भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महिला राजकीय नेतृत्व<br>**प्रा. ज्योती काळबांडे (खंदारे)** | २५-३० |
| ७ | भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षता व संप्रदायवाद<br>**प्रा. डॉ. माधव केरबा वाघमारे** | ३१-३५ |
| ८ | महात्मा गांधीजींचा जगावरील प्रभाव<br>**Dr. Madhukar Vithoba Jadhav** | ३६-४० |
| ९ | भारतातील आरक्षण धोरणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी<br>**प्रा. निकम रमेश जगन्नाथ** | ४१-४५ |
| १० | भारतीय संविधाननिर्मितीमध्ये महिलांचे राजकिय नेतृत्व<br>**प्रा. डॉ. सरला वसंतराव मेश्राम** | ४६-५० |
| ११ | भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील लोकमान्य टिळकांचे योगदान<br>**प्रा. विजय डी. वाकोडे** | ५१-५४ |
| १२ | आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण<br>**डॉ. स्वामी विरभद्र गुरप्पा** | ५५-६१ |
| १३ | धर्म आणि धर्मनिरपेक्षता (विश्लेषणात्मक व तुलनात्मक अभ्यास)<br>**प्रा. विरेंद्र मुरलीधर घरडे** | ६२-६७ |

# ३. भारतीय संविधानातील आरक्षण विषयक तरतूदी

**डॉ. अरूण पेंटावार**
राज्यशास्त्र विभागप्रमुख, सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव.

**सारांश**

भारतीय राज्यघटनेत सामाजिकदृष्ट्या वंचित जाती व जमातींसाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आलेली आहे. ही तरतूद शिक्षण, नोकऱ्या आणि कायदेमंडळातील प्रतिनिधित्व अशा तीन स्तरावर करण्यात आलेली आहे. यामध्ये राज्यघटनेतील तिसऱ्या प्रकरणात कलम 15(3) व 15(4) या अंतर्गत सरकारला आरक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. यातील कलम 15(3) नुसार स्त्रियांसाठी विशेष सवलती तर कलम 15(4) नुसार अनुसूचित जाती व जमातींसाठी तसेच सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गासाठी विशेष सवलती देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेतच 335 या विशेष कलमाची तरतूद करून शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षण दिलेले आहे. तर कलम 330 नुसार संसदेमध्ये आणि 332 नुसार विधानसभांमध्ये राजकीय प्रतिनिधित्व देण्याची तरतूद केलेली आहे.

मुख्य शब्द: आरक्षण, संविधान, कलम इ.

**प्रस्तावना**

भारतातील आरक्षणाचा इतिहास देशाच्या स्वातंत्र्य पेक्षाही जुना आहे. देशात स्वातंत्र्यापूर्वी नोकऱ्या आणि शिक्षणाच्या क्षेत्रात व मागासवर्गीय जाती मध्ये समानता आणण्यासाठी खऱ्या अर्थाने आरक्षणाची सुरुवात झाली. सर्वप्रथम आरक्षणाची मागणी महान समाजसुधारक महात्मा फुले यांनी 1882 साली केली होती. त्यांनी सर्व लोकांसाठी शिक्षण व नोकऱ्यांमध्ये आरक्षण आणि प्रतिनिधित्व ची मागणी केली होती. मात्र मात्र 1901 मध्ये छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी मागास प्रवर्गातील गरीबी दूर करण्याच्या आणि त्यांना समान संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने त्यांच्या प्रशासनात नोकऱ्या देण्यासाठी आरक्षणाची सुरुवात केली. हा खऱ्या अर्थाने मागास व दलित वर्गाच्या कल्याणासाठी आरक्षण देण्याचा हा भारतातील पहिला शासकीय आदेश होता.

महात्मा फुले आणि छत्रपती शाहू महाराज यांचा आदर्श घेऊन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात आरक्षणाची तरतूद केली आहे. व तिचा पाया हा सामाजिक मागासलेपणा हा आहे. भारतातील सामाजिक असमानता विविधता व अस्पृश्यता दूर करण्यासाठी, व संपूर्ण मागासवर्गीयांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षण हे अनिवार्य बनले होते. आरक्षणाशिवाय मागासवर्गीयांची उन्नती ही अशक्य होती. याची जाणीव झाल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आरक्षणाला संविधानिक पाया

मिळवून दिला. मागासलेल्यांना म्हणजेच शासकिय भाषेत अनुसूचित जाती व जमातींना आरक्षणाचे फायदे हे जेव्हा पर्यंत त्यांची संपूर्ण उन्नती होणार नाही. व समाजामध्ये एक स्तरीय समानता निर्माण होणार नाही. तेव्हा पर्यंत त्यांना मिळत राहतील. अशी तरतूद त्यांनी संविधानाचीच करून ठेवली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानामध्ये मागास जाती जमातींसाठी शिक्षण, नोकऱ्या व राजकीय क्षेत्रामध्ये प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठी आरक्षणाची तरतूद केलेली आहे. यामध्ये शिक्षण व नोकऱ्यांमध्ये आरक्षण कायमस्वरूपी तर राजकीय आरक्षण हे दहा वर्षासाठी मिळवून दिले होते. भारतातील जाती प्रथा वर्णव्यवस्था व असमानता नष्ट करण्यासाठीच आरक्षण हा एक मार्ग आहे. यासाठीच आरक्षणाची घटनात्मक तरतूद ही एक महत्त्वाची बाब बनलेली आहे.

**शोधनिबंधाची उध्दिष्टे**

1. आरक्षण संकल्पनेचा अभ्यास करणे.
2. आरक्षणाच्या संदर्भात भारतातील संविधानातील तरतुदींचा आढावा घेणे.

**संशोधन पध्दती व स्त्रोत**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. तथ्य संकलनासाठी व्दीतीय स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. यात प्रामुख्याने भारतीय संविधान, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, वर्तमान पत्र, संशोधन पत्रिका, व विविध वेबसाईट वरील माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे.

**आरक्षणाचा अर्थ**

आरक्षण म्हणजे आपले स्थान सुनिश्चित करणे होय. आजच्या काळात प्रत्येक व्यक्तीला प्रत्येक ठिकाणी आपले स्थान निश्चित करायचे असते. यामध्ये शैक्षणिक क्षेत्र नोकरी सार्वजनिक सेवा आणि राजकीय क्षेत्र इत्यादी यात आपले स्थान सुनिश्चित करण्यासाठी सर्वांचेच प्रयत्न चालू असते यातूनच आरक्षणाची संकल्पना पुढे आलेली आहे.

सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण दूर करण्यासाठी तसेच सरकारी नोकऱ्या, शैक्षणिक संस्था व राजकीय क्षेत्रामध्ये मागासवर्गीयांना पुरेसे प्रतिनिधित्व प्रधान करण्यासाठीच आरक्षण ही प्रणाली अस्तित्वात आलेली आहे.

**भारतीय संविधानातील आरक्षण विषयक तरतूदी**

भारतीय राज्यघटनेची अंमलबजावणी 26 जानेवारी 1950 रोजी झाली. या राज्यघटनेमध्ये मागास वर्गीय समूहाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आरक्षणाची तरतूद मूळ घटनेतच केलेली आहे. या घटनेमध्ये विविध कलमांतर्गत आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. राज्यघटनेमध्ये अनुसूचित जाती व जमातींसाठी तसेच इतर मागास प्रवर्गासाठी शिक्षण, नोकऱ्या व राजकीय प्रतिनिधित्व यामध्ये आरक्षणाची तरतूद केलेली आहे.

भारतीय राज्यघटनेमध्ये मुळातच तीन प्रकारच्या आरक्षणाची तरतूद करण्यात आलेली आहे. ते म्हणजे शैक्षणिक आरक्षण, नोकऱ्यांमधील आरक्षण व राजकीय आरक्षण होय. तीन प्रकारच्या आरक्षणाची तरतूद विविध कलमांतर्गत राज्यघटनेमध्ये करण्यात आलेली आहे. ती पुढील प्रमाणे.

अ. शैक्षणिक व नोकऱ्यांमधील आरक्षणाची तरतूद

राज्यघटनेच्या प्रकरण तीन मधील मुलभूत अधिकाराअंतर्गत आरक्षणाची तरतूद करण्यात आलेली आहे. इतर तरतुदीबरोबरच घटनेचे कलम १५ आणि कलम १६ हे प्रामुख्याने लक्षात घेतले पाहिजे. ही दोन्ही कलमे घटनेच्या तिसऱ्या प्रकरणात म्हणजे मूलभूत हक्कात येतात. प्रत्येक कायदा नागरिकांना एकमेकांच्या विरुद्ध किंवा समाजाच्या विरुद्ध अधिकार देत असतो; परंतु मूलभूत हक्क हे नागरिकांचे किंवा व्यक्तींचे असे हक्क आहेत, की जे, संसदेलाही काढून घेता येणार नाहीत. मूलभूत हक्कांवर गदा आणणारा कायदा संसदेने केल्यास तो देखील घटनाबाहय असल्याचे न्यायालय सांगू शकते. घटनेच्या कलम १५ पोटकलम ४ मध्ये अशी व्यवस्था केलेली आहे की, जर कुणी एक समाज घटक हा सामाजिकदृष्ट्या किंवा शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला असेल किंवा अनुसुचितजाती मागासवर्गीय, किंवा अदिवासी असेल तर त्यांच्यासाठी विशेष आरक्षण दिले जाऊ शकते.

मागासवर्गीय किंवा अदिवासी यांच्याबाबतीत सामाजिक भेदभाव होता. त्यांना शिक्षणाच्याही सोयी नव्हत्या. त्याचप्रमाणे दुर्गम भागात राहणाऱ्या काही जाती-जमाती या सर्व सोयी-सुविधांपासून वंचित होत्या. त्यांच्यासाठी शैक्षणिक संस्थांमध्ये कलम १५च्या पोटकलम ५ ने अग्रहक्काने प्रवेश देण्याचे तरतूद केली. मग यात सरकारने चालवेल्या संस्था असोत किंवा अनुदानित अथवा विनाअनुदानित संस्था असोत तिथे आरक्षण ठेवलेले आहे.

घटनेचे कलम १६ हे समान संधी उपलब्ध करून देण्याबाबत आहे. जे समाज घटक किंवा जाती नोकऱ्यांमध्ये किंवा सामाजिक उन्नत स्तरावर पुरेशा प्रमाणात दिसत नाहीत. त्यांच्यासाठी नोकऱ्यांमध्ये आरक्षणाची तरतूद केलेली आहे. त्याचप्रमाणे मागासवर्गीय व अदिवासी यांच्याबाबतीत त्यांना अशी तरतूद असण्याची गरज आहेच, असे गृहीत धरून आरक्षणाची सोय केलेली आहे. म्हणून या कलमाखाली नोकरीत घेताना किंवा नोकरीमध्ये पदोन्नती करताना आरक्षणाची तरतूद केली जाऊ शकते; पण येथे हे लक्षात घेतले पाहिजे की जे निकष आहेत, ते सामाजिक मागासलेपण, शैक्षणिक मागासलेपण किंवा सामाजिक वर्णभेद याचा विचार यात केलेला आहे.

कलम 16, हे सरकारी नोकऱ्या आणि सेवांमध्ये संधीची समानता प्रदान करते. परंतु 16 (4) 16 (4) (a), 16 (4) (b) आणि कलम 16 (5) राज्याच्या कोणत्याही मागासवर्गीय नागरिकांना सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याचा अधिकार देते.

राज्यघटनेच्या अनुच्छेद 16 (4) (ए) द्वारे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे पदोन्नतीमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व नाही असे राज्याचे मत असल्यास अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींना पदोन्नती

मध्ये आरक्षण देता येईल अशी तरतूद करण्यात आली आहे व नंतर 85 व्या घटना दुरुस्ती मध्ये पदोन्नती मधील आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेतच 335 या विशेष कलमाची तरतूद करून शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षण दिलेले आहे.

ब. राजकीय किंवा निवडणुकीतील आरक्षणाची तरतूद

घटनेच्या प्रकरण चार मधील मार्गदर्शक तत्त्वे या अंतर्गत राजकीय आरक्षण विषयक तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये शैक्षणिक बाबतीत, सामाजिक बाबतीत अगदी राजकारणात देखील समान संधी मिळाव्यात अशा तरतुदी आहेत आणि या दृष्टीने कलम ३८ असे म्हणते की समाज कल्याणासाठी राज्याने तरतूद केली पाहिजे, सामाजिक न्याय प्रस्थापित व्हायला हवा. आर्थिक सबलता निर्माण व्हायला हवी आणि राजकीय प्रतिनिधित्वही मिळायला हवे. यातूनच मग घटनेच्या अन्य कलमाप्रमाणे ग्रामपंचायती, पंचायत समित्या, नगरपालिका, विधानसभा, संसद या सर्व ठिकाणी अनूसुचित जाती, अनूसुचित जमाती महिला यांच्यासाठी आरक्षणाची तरतूद आहे.

राजकीयदृष्ट्या वर्षानुवर्षे वंचित राहिलेल्या जाती व जमातीसाठी राजकीय प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठी त्यांना निवडणुकांमध्ये आरक्षणाची तरतूद ही घटनेतच करण्यात आलेली आहे. यामध्ये संसदेतील प्रतिनिधित्व, राज्य विधिमंडळातील प्रतिनिधित्व, तसेच पंचायत राज संस्थांमधील प्रतिनिधित्व यांचा समावेश होतो. देशातील मागासवर्गीय जाती-जमातींना प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठी त्यांना निवडणुकांमध्ये आरक्षण देण्यात आलेली आहे.

- कलम 243 नुसार मागासवर्गीय जाती-जमातींना पंचायतराज संस्थांमध्ये घटनेमध्ये चा आरक्षणाची तरतूद करण्यात आलेली आहे. यामध्ये 93 व 94 व्या घटना दुरुस्तीनुसार आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.
- कलम 330 अंतर्गत संसदेमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.
- कलम 332 नुसार राज्य विधानसभा मध्ये अनुसूचित जाती व जमातींसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा ठेवण्यात आलेले आहेत व आरक्षणाची तरतूद आहे.

राज्यघटनेचा वरील विविध कलमांतर्गत राजकीय आरक्षणाची तरतूद करण्यात आलेली आहे. मात्र घटनेच्या कलम 334 नुसार राजकीय आरक्षणाला फक्त दहा वर्षांची मुदत देण्यात आली होती. परंतु 1960 पासून ते आज पर्यंत विविध घटना दुरुस्ती च्या माध्यमातून दर दहा वर्षांनी ही मुदत वाढविण्यात येत आहे. सध्या राजकीय आरक्षणाची मुदत ही 2025 पर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

क. भारतीय संविधानातील आरक्षणाची तरतूद असलेली इतर कलमे

- कलम 338 (अ) नुसार सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गाबाबत शिफारशी करण्यासाठी राष्ट्रीय मागासवर्ग आयोग स्थापन करण्याची तरतूद आहे.

- **कलम 340 नुसार सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गाच्या परिस्थितीची चौकशी करून त्यांच्या विकासासाठी केंद्र किंवा राज्य शासनास शिफारशी करण्याकरिता राष्ट्रपती आयोगाची स्थापना करतील अशी तरतूद करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने काका कालेलकर आयोग मंडल आयोग असे मागासवर्ग आयोग स्थापन करण्यात आले होते.**
- **कलम 342 (अ) एखादे राज्य अथवा केंद्रशासित प्रदेशामध्ये एखाद्या प्रवर्गात सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास घोषित करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना प्रदान करण्यात आलेला आहे.**

**निष्कर्ष**

- **भारतीय राज्यघटनेत शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या लोकांसाठी शिक्षण नोकरी व राजकीय आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.**
- **अनुसूचित जाती व जमाती यांच्या आरक्षणासाठी घटनात्मक संरक्षण उपलब्ध आहे.**
- **भारतीय घटनेमध्ये शिक्षण व नोकरी यांसह पदोन्नतीतील आरक्षणाचे ही तरतूद करण्यात आली आहे.**
- **अनुसूचित जाती व जमातींना लोकसंख्येच्या प्रमाणात राजकीय आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.**

**संदर्भ ग्रंथ सूची**


- **एम. लक्ष्मीकांत, (2017), इंडियन पॉलिटी, के'सागर पब्लिकेशन्स, पुणे.**
- Sharma, S. R., (2012), "Indian Constitution and Reservations Issue", Current Publications, Delhi.
- **राहुल. के, मार्च 2021, "मराठा आरक्षण आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेली संधी," साधना साप्ताहिक, साधना प्रकाशन, पुणे.**
- **पवार, ज. वि., 8 ऑक्टोबर 2013, "असंविधानिक आणि अनाठायी मागणी", दै. लोकसत्ता (संपादकीय).**
- **मथाळे बाळकृष्ण, 8 मे 2021, "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना खरच 10 वर्षासाठी आरक्षण हवे होते ?", दैनिक सकाळ.**
- **गुप्ता राजेश कुमार, (2020), "भारत में आरक्षण नीति", गौतम प्रकाशन. दिल्ली.**

ISSN 2277-8063 (Print)
June-2022
Vol. XI/ Issue. II / 2022
Impact Factor –7.958

# Navjyot
नवज्योत

## International Interdisciplinary Research Journal
## Science, Humanities, Social Sciences, Languages, Commerce & Management

*(A Quarterly, High Impact Factor, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*Indexed by:*

Scientific Journal Impact Factor
TOGETHER WE REACH THE GOAL
IIJIF iiJS Cosmos

**Chief Editor**
**Prof. Dr. Ravindra P. Bhanage**
Dept. of Political Science,
Shivaji University,
Kolhapur.

**Editor**
**Prof. Dr. Shivaji Subrao Patil**
Dept. of Political Science,
Chhatrapati Shivaji College,
Satara.

*- Published by-*
**HOUSA Publication**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 22 | राज्यशास्त्र | मतदारांची उदासीनता : भारतीय लोकशाही समोरील एक आव्हान | प्रा. राजू लिंबाजी पारडे | ८१-८४ |
| 23 | अर्थशास्त्र | महिला सशक्तीकरण व लोकशाही | प्रा. डॉ. आर. एस. शिंदे तुकाराम सिताराम कोकरे | ८५-८७ |
| 24 | हिंदी | संविधानिक मूल्य और हिंदी कविता | प्रा. हिरामण देवराम टोगारे | ८८-९० |
| 25 | समाजशास्त्र | सामाजिक चळवळीचे बदलते स्वरूप | डॉ. राजश्री बाबुराव मालेकर | ९१-९५ |
| 26 | वाणिज्य | भारतीय अर्थव्यवस्था विकासातील लोकशाहीची भूमिका | डॉ. अवधूत भाऊ पाटील नवले | ९६-९७ |
| 27 | वाणिज्य | बदलती प्रसारमाध्यमे व लोकशाही | श्रीमती. सोनाली चंद्रकांत पटेकर | ९८-१०१ |
| 28 | मराठी | महिला सबलीकरण आणि लोकशाही | प्रा. डॉ. सौ. निर्मला वसंतराव मोरे | १०२-१०८ |
| 29 | राज्यशास्त्र | भारतीय संघराज्यवादाचे बदलते स्वरुप | डॉ. अरुण पेंटवार | १०९-११२ |
| 30 | इतिहास | भारतीय स्वातंत्र चळवळीत कम्युनिस्ट पक्षाचा सहभाग | सिद्धेश्वर रामचंद्र गाडीलोहार | ११३-११७ |
| 31 | रसायनशास्त्र | राज्यपालांची बदलती राजकीय भूमिका | श्री. गोविंद देविदास साळुंखे | ११८-११९ |
| 32 | हिंदी | महिला सशक्तिकरण और लोकतंत्र | श्रीमती. लता शिवाजी करांडे | १२०-१२३ |
| 33 | इतिहास | सामाजिक चळवळीचे बदलते स्वरूप हे एक आव्हान | श्री. अनिल पोपट लोखंडे | १२४-१३० |
| 34 | हिंदी | हिंदी कविता में चित्रित लोकतंत्र | डॉ. निशाराणी महादेव देसाई | १३१-१३४ |
| 35 | वाणिज्य आणि व्यवस्थापन | ग्रामीण आर्थिक विकासात कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी दुध उत्पादक संस्थेची भूमिका | श्रीमती एस.सी.इंगवले | १३५-१३६ |
| 36 | मराठी | स्वांतत्र्यपूर्व काळातील राजकीय कांदबरी | प्रा.रेखा काशिनाथ पसाले | १३७-१३९ |

# भारतीय संघराज्यवादाचे बदलते स्वरूप

**डॉ. अरूण पेंटावार,** राज्यशास्त्र विभागप्रमुख सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव, जि.बीड.मो. नं 9067449988 arunpentawar@gmail.com

---

**सारांश:** भारतीय राज्यघटनेमध्ये संघराज्य शासन प्रणालीच्या सरकारची तरतूद आहे. देशाचे मोठे आकारमान आणि सामाजिक व सांस्कृतिक विविधता या दोन कारणांमुळे घटनाकारांनी संघराज्य शासन पद्धती स्वीकारली आहे. **संघराज्य म्हणजे केंद्र व राज्य अशा दोन स्तरावर स्वायत्त शासन यंत्रणा अस्तित्वात असणे.** भारताचे संघराज्य हे पूर्णतः संघराज्यीय स्वरूपाचे नसून त्यात केंद्र सरकारचे अधिकार वाढवणाऱ्या आणीबाणीसारख्या अनेक तरतुदी आहेत. त्यामुळे भारतीय संघराज्य हे अर्धसंघराज्यीय आणि एकात्मिक संघराज्य आहे असे संघराज्याचा अभ्यास करणारे विचारवंत व घटनातज्ञांचे मत आहे. पण १९९० नंतरच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय बदलांमुळे संघराज्याचे स्वरूप बदलत असल्याचे दिसून येते.

**Key Words:** संघराज्य, संघराज्यवाद, भारतीय संघराज्य इत्यादी.

**प्रस्तावना:** केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्यातील परस्पर संबंधावरून शासनाचे दोन प्रकार पडतात. ते म्हणजे एकात्मिक शासन पद्धती आणि संघराज्य शासन पद्धती होय. एकात्मक शासन पद्धतीमध्ये सर्व अधिकार हे केंद्र शासनाकडे असतात तर संघराज्य शासन पद्धती मध्ये केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यामध्ये घटनेनुसारच अधिकारांची विभागणी केली जाते. ब्रिटन, फ्रान्स व जापान यासारख्या देशामध्ये एकात्मिक शासन पद्धती अस्तित्वात आहे. तर अमेरिका कॅनडा व ऑस्ट्रेलिया यासारख्या देशांमध्ये संघराज्य शासन पद्धती अस्तित्वात आहे.

आधुनिक काळात मूलतः समान हितसंबंध, समान सामाजिक व सांस्कृतिक वारसा, समान उद्दिष्टे, भौगोलिक व्याप्ती व तसेच प्रशासनाच्या सोयीसाठी अनेक देशांमध्ये संघराज्य शासनाचा प्रयोग स्वीकारण्यात आला. संघराज्याच्या निर्मितीच्या मुख्यता दोन प्रक्रिया आहेत. ते म्हणजे केंद्राकर्षी व केंद्रोत्सारी होय. केंद्राकर्षी प्रक्रियेत स्वतंत्र प्रदेश किंवा राज्य एकत्र येऊन संघराज्य शासन निर्माण करतात. उदा. अमेरिका. यामध्ये अमेरिकेतील तेरा स्वतंत्र वसाहती मिळून एक संघराज्य निर्माण झाले आहे. केंद्रोत्सारी प्रक्रियेत एका अखंड भूप्रदेश भौगोलिक व्याप्ती किंवा प्रशासन किंवा विविध कारणामुळे घटक राज्य शासन निर्माण केले जातात. उदा. भारत. कारण भारतातील सामाजिक, राजकीय, धार्मिक विविधता व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने संघराज्य शासन अस्तित्वात आलेला आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये संघराज्य शासन प्रणालीच्या सरकारची तरतूद आहे. देशाचे मोठे आकारमान आणि सामाजिक व सांस्कृतिक विविधता या दोन कारणांमुळे घटनाकारांनी संघराज्य शासन पद्धती स्वीकार केलेला आहे. प्रस्तुत शोधनिबंधात संघराज्याचा अर्थ संघराज्याची सर्वसाधारण वैशिष्ट्ये व भारतीय संघराज्याचे बदलते स्वरूप यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे:**

1. संघराज्य शासन संकल्पनेचा अभ्यास करणे.

2. भारतातील संघराज्य शासनाच्या बदलत्या स्वरूपाचा आढावा घेणे.

**संशोधन पध्दती व स्त्रोत:** प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. तथ्य संकलनासाठी व्दीतीय स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. यात प्रामुख्याने संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, वर्तमान पत्र, संशोधन पत्रिका, व विविध वेबसाईट वरील माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे.

**संघराज्य शासनाचा अर्थ**

संघराज्य म्हणजे केंद्र व राज्य अशा दोन स्तरावर स्वायत्त शासन यंत्रणा अस्तित्वात असणे होय. संघराज्य म्हणजे इंग्रजीतील 'Federation' हा शब्द 'Foedus' या लॅटिन शब्दापासून बनला आहे. त्याचा अर्थ आहे करार किंवा सहमती. राज्यातील सहमतीनुसार किंवा राज्या-राज्यामधील करारानुसार संघराज्य हे नवे राज्य स्थापन होते. संघराज्यातील घटकांना अमेरिकेत स्टेट्स, स्विझरलँड मध्ये कॅन्टन, कॅनडामध्ये प्रॉव्हिन्सेस, रशियामध्ये रिपब्लिक तर भारतामध्ये राज्य असे संबोधले जाते.सर्वसाधारणपणे संघराज्य म्हणजे अधिकार वाटपाची अशी व्यवस्था आहे की, ज्यामध्ये केंद्रस्तरावर व राज्य स्तरावर दोन शासन निर्माण केल्या जातात. त्यांच्यामध्ये राज्यघटनेनुसार अधिकारांची विभागणी केली जाते व काही संघर्ष निर्माण झाल्यास न्यायव्यवस्थेद्वारे सोडविण्याचा प्रयत्न केला जातो.

**संघराज्यवादाची सर्वसाधारण वैशिष्टे**

संघराज्य म्हणजे केंद्र व राज्य अशा दोन स्तरावर स्वायत्त शासन यंत्रणा अस्तित्वात असणे. अमेरिकेने आधुनिक अर्थाने संघराज्य व्यवस्थेला सुरुवात केली. अमेरिकन संघराज्य प्रतिमानानुसार संघराज्य व्यवस्थेची पाच ठळक वैशिष्ट्ये असतात.

1.दुहेरी राज्यव्यवस्था किंवा शासन (केंद्र सरकार व राज्य सरकार)

2.सत्ता किंवा अधिकारांची विभागणी- ही अधिकार विभागणी स्पष्ट व घटनेद्वारे केलेली असावी.

3.लिखित व परीदृढ म्हणजे बदलण्यास कठीण असणारी राज्यघटना.

4.स्वतंत्र न्यायमंडळ याचे उद्दिष्ट केंद्र व राज्य किंवा राज्य व राज्य यांतील विवाद निष्पक्षपातीपणे सोडवणे.

5.द्विगृही केंद्रीय कायदेमंडळ. यातील एक सभागृह जनतेचे प्रतिनिधित्व करणारे आहे मात्र दुसरे सभागृह घटकराज्यांचे प्रतिनिधित्व करते.

कोणत्याही संघराज्य व्यवस्थेमध्ये ही आधारभूत वैशिष्ट्ये आढळून येतात. म्हणूनच या वैशिष्ट्यांना संघराज्य व्यवस्थेची मूलभूत तत्वे मानली जातात.

**भारतीय संघराज्यवादाचे बदलते स्वरूप:** भारताचे संघराज्य हे पूर्णतः संघराज्यीय स्वरूपाचे नसून त्यात केंद्र सरकारचे अधिकार वाढवणाऱ्या आणीबाणीसारख्या अनेक तरतुदी आहेत. त्यामुळे भारतीय संघराज्य हे अर्धसंघराज्यीय आणि एकात्मिक संघराज्य आहे असे संघराज्याचा अभ्यास करणारे विचारवंत व घटनातज्ञांचे मत आहे. पण १९९० नंतरच्या सामाजिक आर्थिक आणि राजकीय बदलांमुळे संघराज्याचे स्वरूप बदलत असल्याचे दिसून येते. १९९० नंतर भारतीय राजकारणात संघराज्यांच्या संदर्भात अनेक वेगवेगळे प्रवाह निर्माण झालेले आपणास दिसतात हे प्रवाह किंवा बदलते स्वरूप खालीलप्रमाणे.

1) भारतीय संघराज्याच्या रचनेचा वा फेररचनेचा आधार भाषा हा होता. भाषेच्या आधारावर भारतात राज्यांची फेररचना करज्यात आली पण आता भाषिक आधारा ऐवजी सांस्कृतिक आधार जास्त महत्त्वाचा ठरत असून त्यामुळे अनेक राज्यांच्या फेररचनेची मागणी होत असताना आपणास दिसते.

2) भारतात राष्ट्रपालकीवरील राजकीय पक्षांचा -हास होत असून काँग्रेस व भाजप या दोन्ही राष्ट्रीय पक्षांना केंद्रात सरकार स्थापन करण्यासाठी प्रादेशिक पक्षांच्या वा इतर लहान पक्षांच्या पाठिंब्यावर अवलंबून राहावे लागत आहे त्यामुळे केंद्रातील सरकारला सहमतीच्या आधारावर राज्य करणे आता अपरिहार्य बनत आहे.

3) सर्वोच्च न्यायालयाचे १९९२ साली एस. आर. बोसाई खटलमात घटनेच्या ३५६ कलमाच्या वापरावर बंधनं आजही आहेत आणि या बंधनामुळे आपल्या इच्छेप्रमाणे राज्यास राष्ट्रपती शासन लादणे केंद्रसरकारला अशक्य बनत आहे.

4) उदारीकरणाच्या नव्या आर्थिक धोरणामुळे केंद्राचे अधिकार कमी होत असून राज्यांना काम करण्यास जास्त वाव मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे आपणास जास्त अधिकार मिळावेत अशी राज्यांची मागणी आहे.

5) भारतात भाषेच्या आधारावर प्रांतांची रचना करावी यासाठी १९५०-६० या काळात महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक, गुजरात या प्रांतात व्यापक चळवळी झाल्या. त्यामुळे १९६० पर्यंत भारतात भाषिक राज्यांची स्थापना झाली पण या भाषा या आधार घटकास संस्कृतीच्या अलगपणाच्या आधारे आव्हान मिळावयास सुरुवात झाली ते आव्हान मुख्यतः पूर्वेकडच्या राज्यात निर्माण झालेले आपणास दिसते. त्यामुळे १९७० च्या दशकात आपल्या सांस्कृतिक व वांशिक अस्मितेच्या जोरावर अनेक छोट्या छोट्या विभागांनी आसामपासून वेगले राज्य स्थापन करण्याची मागणी केली.

6) सांस्कृतिक व वांशिक अलगतेच्या आधारावर वेगल्या राज्यांची मागणी काही भागातून पुढे यावयास सुरवात झाली. मध्य व पूर्व भारतातील झारखंड आणि छालीसगड या भागात वेगल्या राज्याच्या मागणीने जोर धरला. या भागात आदिवासींची संख्या मोठ्या प्रमाणात होती आणि वेगळे राज्य स्थापन केल्याशिवाय नैसर्गिक साधन सामुग्रीने संपन्न असणाऱ्या या भागात गरिबी व मागासलेपणा मोठ्या प्रमाणात होता. झारखंड मुक्ती मोर्चा व छत्तिसगड मुक्ती मोर्चा या चळवळी गाजल्या आणि अंतिमतः केंद्र सरकारला सर्व पक्षांच्या पाठिंब्यावर ही दोन नवी राज्ये स्थापन करणे भाग पडले. उत्तरांचल हे नवे राज्य सांस्कृतिक घटकाबरोबरच पृथगात्म प्रादेशिक अस्मितेचा पर्वलीय भागातील जनतेच्या अपेक्षांचा व आकांक्षांचा पुरस्कार करताना आपणास दिसते.

7) आता राजकारणाचा केंद्रबिंदु प्रादेशिक वा भाषिक अस्मितांचा पुरस्कार करणे हा नसून विकासाच्या अनुशेषाचा आहे. मोठ्या राज्यास आपला विकास होत नाही, आपल्याकडे दुर्लक्ष होते, छोटी राज्ये सगळ्याच भागात चांगले काम करीत आहेत म्हणून छोटी राज्ये हवीत असा आग्रह धरला जात आहे. तेलंगाना व विदर्भ या विभागांची स्वतःची अशी भाषिक वांशिक वा पृथगात्म सांस्कृतिक अस्मिता नसली तरी आपला वेगळेपणा ऐतिहासिक काळापासून आपण वेगले आहोत या तत्वांवर मांडला जातांना आपणास दिसतो. त्यातही विकासाच्या अनुशेषाचा

आपल्याकडे राज्यातील विकसित भागांनी दुर्लक्ष केले असल्याचा मुका ठासून मांडण्यात येतो. तेलंगाना. विदर्भ, जम्मू. लडाख, गुरखालँड, प-उत्तरप्रदेश (हरित प्रदेश) यासारख्या वेगळ्या राज्यांच्या मागण्या जोर धरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

8) भारतामधील राष्ट्रीय पक्षांचा प्रभाव कमी होत आहे. काँग्रेस वा भाजप हे जे दोन खऱ्या अर्थाने राष्ट्रीय पक्ष आहेत, त्यांना स्वतःच्या बळावर बहुमत मिळण्याची शक्यता नाही. राज्याराज्यात प्रादेशिक पक्षांचा प्रभाव वाढत आहे. त्यामुळे आकाडीची सरकारे केंद्रात स्थापन होत आहेत. या आकाडीच्या सरकारात प्रादेशिक पक्षांची भूमिका महत्वाची आहे. त्यामुळे प्रादेशिक पक्षांना सांभाळून घेतच केंद्र सरकारला काम करावे लागणार आहे. केंद्रसरकारला आता पूर्वीप्रमाणे राज्यांच्या अधिकारांना मर्यादित करणे शक्य होणार नाही. कदाचित आर्थिक बाबतीत राज्यांना जास्त अधिकार देणे त्यांना भाग पडणार आहे. त्यामुळे राजकीय प्रक्रियेचा विचार करता संघराज्यात राज्यांचे प्रत्यक्षात अधिकार वाढणार आहेत.

**निष्कर्ष**

• भारतीय घटनाकारांनी संघराज्य व्यवस्थेला आवश्यक असणारी पाचही वैशिष्ट्ये आपल्या राज्यघटनेत स्वीकारली आहे. केंद्र-राज्य यांना स्वतंत्र अस्तित्व दिले, अधिकारांची विभागणी करण्यासाठी संघसूची, राज्यसूची व समवर्ती सूची निर्माण केली. स्वतंत्र न्यायव्यवस्था निर्माण करून घटनेचा अन्वयार्थ लावण्याची व संघ–राज्यांतील वाद सोडवण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयाकडे दिली आणि राज्यसभा हे राज्यांचे प्रतिनिधिगृह म्हणून लोकसभेसोबत संसदेचा अविभाज्य भाग बनवले.

• स्वातंत्र्याच्या काळातील राष्ट्रउभारणीच्या विविध आव्हानांचा विचार करून प्रबळ केंद्र असलेल्या संघराज्याची निर्मिती घटनाकारांनी केली. हे अनेक तरतुदींवरून दिसून येते

• १९९० नंतरच्या सामाजिक आर्थिक आणि राजकीय बदलांमुळे संघराज्याचे स्वरूप बदलत असल्याचे दिसून येते. १९९० नंतर भारतीय राजकारणात संघराज्यांच्या संदर्भात अनेक वेगवेगळे प्रवाह निर्माण झालेले आपणास दिसतात.

• समकालीन परिस्थितीतील केंद्र व राज्य यांतील परस्पर संघर्ष, राष्ट्रीय व प्रादेशिक राजकीय पक्षांमधील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारतीय संघराज्यवादाचे स्वरूप बदलत आहे.

• केंद्र व राज्यात परस्पर विरोधी पक्षाची सत्ता असल्यास यांच्यातील संघर्षामधूनच संघराज्यवाच्या मुल्यांना पायदळी तुडवले जात आहेत.

**संदर्भ ग्रंथ सूची**

• डॉ. शर्मा, रश्मी, (2020), भारत में संघवाद, एस.बी.पी.डी. पब्लिकेशन्स, दिल्ली.

• जाधव तुकाराम, शिरपूरकर महेश, (2012), भारतीय संविधान व भारतीय राजकारण-भाग 1, द युनिक अॅकॅडमि पब्लिकेशन्स, पुणे.

• एम. लक्ष्मीकांत, (2017), इंडियन पॉलिटी, के'सागर पब्लिकेशन्स, पुणे.

• Dr. Jain S.K, (2018), Indian Federalism:Emerging Issues, Kalpaz Publications, New Delhi.

• Panikkar, K.M., (2019), 'Federal India', Eastern Book Linkers Publications, Delhi.

Peer Reviewed

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized Higher Education For All Subjects & All Languages

Oct. 2022 Issue - 60 Vol. 1

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

# Index

| | | |
|---|---|---|
| 1. | RegionalismA Major Issue in India<br>Dr. Vilas Aghav | 9 |
| 2. | Different views of Corruption in Indian Politics<br>Dr.ArunPentawar | 12 |
| 3. | Gender Discrimination<br>Dr. Kalpana Manikrao Kadam | 14 |
| 4. | Problems Faced by Working Women At Workplace in India<br>Dr.NasreenB.L. Shaikh | 17 |
| 5. | A Casteism in Indian Politics<br>Dr. Akash S. Bangar | 19 |
| 6. | Dr. B. R. Ambedkar's Idea and Reflections on Nationalism<br>Dr. Kishor N. Ingole | 22 |
| 7. | Political leader's characteristics, mental process and behavior -A psychological imperial study.<br>Dr.ShekarSubhash Tulshiram | 27 |
| 8. | व्यक्तिस्वातंत्र्याचा आविष्कार आणि प्रसारमाध्यमे<br>डॉ. दत्ताजी हुलप्पा मेहत्रे | 31 |
| 9. | लोकशाही उदय व विकासाचा ऐतिहासिक अभ्यास<br>डॉ. बाळासाहेब शंकरराव क्षिरसागर | 33 |
| 10. | लोकशाही: अर्थ आणि लोकशाहीसाठी आवश्यक अटी<br>प्रा. डॉ.कऱ्हाळे उत्तम सिताराम | 36 |
| 11. | भारतीय लोकशाहीसमोरील समकालीन समस्या ('धूळपावलं' या कादंबरीच्या आधारे)<br>डॉ. विष्णू नामदेव लांडे | 39 |
| 12. | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने<br>प्रा.डॉ.बी.एम.नरवाडे | 43 |
| 13. | लोकशाहीत प्रसार माध्यमाची भूमिका<br>डॉ.डी.एस.पटवारी | 46 |
| 14. | लोकशाही : अर्थ आणि लोकशाहीसाठी आवश्यक अटी<br>प्रा.डॉ. कऱ्हाळे विलास लिबांजी | 49 |
| 15. | शाश्वत विकास व पर्यावरण व्यवस्थापन<br>स्वप्रिल बालाजी पाटील | 51 |

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 60 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Oct. 2022 | SJIF | Impact Factor : 7.139

# Different views of Corruption in Indian Politics

**Dr.ArunPentawar**

*Head, Dept. of Political Science*

*Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon.*

**Abstract:**

*India is the largest democracy in the world. India is a very large country in terms of territory and population. Today in India corruption is very rare matter. It is one of the greatest barrier in the journey of development. There are political, economic, social, legal and historic dimensions of corruption. There are many laws against corruption like Prevention of Corruption Act. There are many investigation agencies like CBI. But these laws and institutions suffer from shortcomings. People escape through these shortcomings.*

**Key Words:** Corruption, Politics, Society, Bureaucracy

**Introduction:**

Corruption is always present in the history and it will always be present in the future. Kautilya in his book Arthashastra has discussed about corruption.Today in India corruption is very rare matter. It is one of the greatest barrier in the journey of development. There are political, economic, social, legal and historic dimensions of corruption. There are many laws against corruption like Prevention of Corruption Act. There are many investigation agencies like CBI. But these laws and institutions suffer from shortcomings.Corruption creates a fertile ground for organized criminal activities, even terrorism, as criminals are aided in their illegal activities by the complicity of corrupt public officials.Probably, *corruption* has increased in recent decades. The causes or factors that promote *corruption* are those that affect the demand (by the public) for *corruption*. In this research paper discusses different views of political corruption in India.

**Objectives of the study:**

- To determine the concept of Corruption and Political Corruption.
- To know the study of Political Corruption and its impact on Indian Politics.
- To know the study of Different views of Corruption in Indian Politics.

**Research Methodology & Sources:**

The proposed study mainly is descriptive in nature. The research done is based on secondary data. Here, the data from various research journals, websites and articles are collected in order to understand the concept of Corruption and different views of corruption in Indian politics.

**What is Corruption?**

Corruption is a form of a criminal offense which is undertaken by a person or an organization which is entrusted in a position of authority, in order to acquire illicit benefits or abuse power for one's personal gain. Corruption may involve many activities which include bribery, influence peddling and the embezzlement and it may also involve practices which are legal in many countries.[1]

**What is Political Corruption?**

Political corruption is the abuse of public power, office, or resources by elected government officials for personal gain, by extortion, soliciting or offering bribes. It can also take the form of office holders maintaining themselves in office by purchasing votes by enacting laws which use taxpayers' money.[2]

Stephen D. Morris a professor of politics, wrote that political corruption is the illegitimate use of public power to benefit a private interest.[3]

**Different views of Corruption in Indian Politics:**

Today in India corruption is very rare matter. It is one of the greatest barrier in the journey of development. There are political, economic, social, legal and historic dimensions of corruption.

1. **Political view of Corruption –**

India is the largest democracy in the world. India is a very large country in terms of territory and population. The nation is divided into 28 states and 543 LokSabha constituencies. These constituencies are very large in population and territory. No individual candidate of a constituency has the financial capacity to meet the cost of campaigning. The political parties and candidates appeal to industrialists for donation. Industrialists and rich people provide donation to all major political parties and candidates. Once these candidates get elected

the MPs and MLAs they are morally bound to support these election donors. This tricky cycle of corruption to become rusty for Indian democracy.[4]

2. **Economic view of Corruption –**

In economic history of India we can see close linkages between corruption and economic policies. India followed mixed economy since Independence until 1991. The public sector was provided with the commanding heights of economy. There was a license system so that if any industrialist wants to start a project has to get a license from the Government. Hence he was forced to pay off to get the license. World Institutions like World Bank justify that economy should be deregulated to solve the corruption case.

3. **Bureaucracies view of Corruption-**

In India Bureaucracy performs the functions of administration and development. IAS, IPS, IRS officers are officially in charge of handling thousands of crores while their salaries are in few thousands. As the great political strategist of ancient India Chanakkya the honey hunter will be forced to lick his forehand. Cornwallis the Governor General of India in 1790s during the East India Company's rule in India introduced the Office of Collectors to tackle corruption. He was paid a handsome salary of Rs. 1500 per month in addition to 1% of revenue. This was to desist him from becoming corruption.[5]But there is a second argument that no amount of money can to stop a person from becoming corrupt. Becoming corrupt is a matter of one's character (Character is life).

4. **Society and Social view of Corruption –**

Society is itself responsible for the dissemination of uncontrolled corruption in India. We are end by our social identities created by caste, region, language and religion. If a member of our caste or religion or language is caught and guilty under corruption charges, we out of social devoted sympathise and defend that person. Thus our social mind-set keep alive corruption.

**Conclusion:**

- In India corruption is very rare matter and it is greatest barrier in the journey of development.
- There are many laws & agencies in India to stop corruption.
- The political parties and candidates are corrupted. Industrialists and rich people provide donation to all major political parties and candidates.
- Corruption to become rusty for Indian democracy.
- Society is itself responsible for the dissemination of uncontrolled corruption in India.

**References:**

1. siteresources.worldbank.org.
2. "SOS,Missouri – State ArchivesPublications". Sos.mo.gov. Retrieved 19 April 2013.
3. Morris, S.D. (1991), Corruption and Politics in Contemporary Mexico. University of Alabama Press.
4. Rajan, SudhirChella "A Social Theory of Corruption" (2020).
5. Sharma, VivekSwaroop. "Give Corruption a Chance" in the National Interest 128, November/December 2013




Editor

Dr.Bapu G. Gholap

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Marathwada Shikshan Prasarak Mandal's

## Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon, Dist: Beed (MS)

(NAAC Re-Accredited 'A' Grade with CGPA 3.21)

Interdisciplinary National Conference on

**"Social & Political Problems inIndia: Challenges & Remedies"(SPPICR-2022)**

**20th December 2022**

**Special Issue**

**Editor**

| | | |
|---|---|---|
| **Dr. G. T. Mokasare** | **Dr. A. S. Pentawar** | **Dr. G. K. Sanap** |
| **Convenor** | **Organizing Secretary** | **Principal** |

**Co-Editor**

| | | |
|---|---|---|
| **Dr. N. K. Muley** | **Mr. B. R. Bodke** | **Dr. D. S. Shinde** |
| **Co-Convenor** | **Co-Convenor** | **Co-Convenor** |

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

14) [redacted]
सहा. प्रा. डी.एन रिठे, जि. बीड [redacted]

15) [redacted]
डॉ. अरुण पेंटावार, जिल्हा बीड [redacted]

16) [redacted]
डॉ. आर. बी. काळे, जि. बीड [redacted]

17) [redacted]
श्री महेश अभिमन्यू मोहिते, जि. बीड [redacted]

18) Corruption [redacted]
प्रा.डॉ.दिपक मोहनराव बुक्तरे, हनु[redacted]

19) [redacted]
महादेव सोपानराव घाटूळ, औरंगाबा[redacted]

20) [redacted]
डॉ. जाधव श्रीराम, माजलगाव [redacted]

21) महाराष्ट्रातील आदिवासी विषयक माहिती : एक भौगोलिक अभ्यास
**शितकरधनंजय रमेश, डॉ.सोनवणे श्रीराम विक्रम,माजलगांव** ||77

22) [redacted]
डॉ. गणेश तुकाराम मोकासरे, डॉ.[redacted]

23) [redacted]
श्रीमती संजीवनी डावकर तांगडे, डॉ. [redacted]

24) [redacted]
डॉ. अंकुश एम. गोंडगे, कोल्हापू[redacted]

25) [redacted]
डॉ. ज्ञानराजा चिघळीकर, डॉ. [redacted]

26) [redacted]
स्वाती आश्रुबा देवतर्शे [redacted]

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

15

[redacted]

सारांश

[redacted]

संदर्भ सूची

[redacted]

❑❑❑

[redacted]

[redacted] tutional Bodies [redacted] Ex-
tra- Constitutional Bodies [redacted]

ED, NIA, NSA, CBI, NCB [redacted]

RBI, SEBI, IT, ED, NIA, NSA, CBI, [redacted]

| केंद्रीय स्वायत्त संस्था | | |
|---|---|---|
| संवैधानिक संस्था | संविधानातील तरतुद | संवैधानिक संस्था प्रमुख |
| न्यायालय | अनुच्छेद 124 | भारताचे सरन्यायाधीश |
| निवडणूक आयोग | अनुच्छेद 324 | श्री. सुनील अरोरा (23 वे) |
| संघ लोकसेवा आयोग UPSC | अनुच्छेद 315 – 323 | श्री.प्रदीपकुमार जोशी |
| वित्त आयोग | अनुच्छेद -280 | श्री. नंद किशोर सिंग (15वे) |
| भारताचे नियंत्रक आणि महालेखा परीक्षक | अनुच्छेद – 148 | गिरीशचंद्र मुर्मू |
| संवधिानिक वैधानिक संस्था | | |
| CAT (केंद्रीय न्यायाधिकरण) | RBI & NIA | SEBI &NSA |
| अंमलबजावणी संचालनालय (Enforcement Directorate – ED) | Income Tax Department | CBI & NCB |

संवैधानिक संस्था आणि असंवैधानिक [redacted]

संवैधानिक संस्थांचा गैरवापर [redacted]

राजकीय पक्ष [redacted]

सारांश : [redacted]

CBI, ED [redacted]

संदर्भसूची [redacted]

संवैधानिक संस्थांच्या गैरवापरातून [redacted]

https://chnm-gmu-edu/1989/items/show/

028 [redacted]

Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

**December-2022**

ISSUE No - (CCCLXXXII) 382-A

## Contemporary Issues in Social Sciences and Languages





Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor
Dr. Dhanaji Govind Kanase
Principal
Bharati Vidyapeeth's
Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya, Sangli
Tal- Miraj, Dist- Sangli

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Aadhar International Publication
For Details Visit To : www.aadharsocial.com
All rights reserved with the authors & publisher

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, ( ) 382 - A [redacted]
ISSN : 2278-9308
2022

# INDEX-A



| No. | Title of the Paper Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | [redacted] | [redacted] |
| 2 | [redacted] | [redacted] |
| 3 | [redacted] | [redacted] |
| 4 | [redacted] | [redacted] |
| 5 | [redacted] | 16 |
| 6 | [redacted] | [redacted] |
| 7 | [redacted] | [redacted] |
| 8 | [redacted] | 27 |
| 9 | [redacted] | [redacted] |
| 10 | [redacted] | [redacted] |
| 11 | [redacted] | [redacted] |
| 12 | [redacted] | [redacted] |
| 13 | [redacted] | [redacted] |
| 14 | [redacted] | [redacted] |
| 15 | [redacted] | 50 |
| 16 | [redacted] | [redacted] |
| 17 | [redacted] | [redacted] |
| 18 | [redacted] | 65 |
| 19 | [redacted] | [redacted] |
| 20 | [redacted] | [redacted] |
| 21 | [redacted] | [redacted] |

[redacted]

---

[redacted]

❖
❖
❖

[redacted]

ISSN : 2278-9308

2022

[redacted]


- [redacted]
- [redacted]
- Peter Ronald DeSouza, E Sridharan, "**India's Political Parties**" SAGE Publishing India, 2006.
- RekhaDawkar, "Party System in India", Oxford India Publication, New Delhi. 2017.
- AbdurRazzak, "Political Parties in India", The University Press Limited, Dhaka, 2022.